# महाराष्ट्र न्युज नेटवर्क

RNI NO. MAHMAR/2023/88387
TITLE CODE : MAHMAR/52531
DECL NO. : 1391606

Pune Vol. 2, Issue - 10 (Monday) 26 August to 01 September 2024 (Weekly) Price Rs. 1/- Pages - 16

पुणे वर्ष २रे, अंक १० वा (सोमवार) २६ ऑगस्ट ते ०१ सप्टेंबर २०२४ (साप्ताहिक) किंमत १ रुपये पाने १६


## पुणे विमानतळाला संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे नाव द्या

### मुरलीधर मोहोळ : राज्य शासनाने प्रस्ताव पाठवावा, पाठपुरावा करु

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाला जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे नाव देण्यासाठी, राज्य शासनाने तसा प्रस्ताव तयार करून केंद्र सरकारकडे पाठवावा. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी चर्चा केली.**



या वेळी मोहोळ यांनी सांगितले की, आपल्या भूमिकेवर राज्य सरकारही सकारात्मक असून लवकरच हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला जाईल. त्यानंतर केंद्र सरकारकडे आपण याचा पाठपुरावा करणार आहोत. विमानतळाचे नामकरण करतानाचा प्रस्ताव हा राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे येत असतो आणि त्यानंतर नामांतरावर शिक्कामोर्तब होते. म्हणूनच पुण्याचा लोकप्रतिनिधी या नात्याने राज्य सरकारकडे ही भूमिका मांडली आहे. पुण्याचे विमानतळ असलेल्या लोहगावमध्ये जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकोबारायांचे आजोळ होते. त्यामुळे लोहगाव आणि तुकोबारायांचे नाते जिव्हाळ्याचे होते. शिवाय लोहगावच्या गावकऱ्यांचीही आपल्या भूमिकेप्रमाणेच इच्छा असून महाराष्ट्रातील तमाम वारकरी संप्रदायाचीही संवेदना या विषयाशी जोडलेली आहे. त्यामुळे लोहगावच्या विमानतळाला तुकोबारायांचे नाव देणे अधिक समर्पक ठरणार आहे, असेही केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.

## 'जीएसटी' करदात्यांना खात्याचे तपशील देणे अनिवार्य

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**नवीदिल्ली : एक वैध बँक खात्याचा तपशील दिल्याशिवाय करदात्यांना येत्या सप्टेंबरपासून 'जीएसटीआर-१' हे विवरणपत्र भरता येणार नाही. 'जीएसटी'च्या 'नियम १० अ'नुसार, करदात्याने नोंदणीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत वैध बँक खात्याचा तपशील सादर करणे आवश्यक आहे.**



जे जीएसटी करदाते वैध बँक खात्याचा तपशील सादर करणार नाहीत, त्यांना एक सप्टेंबरपासून जीएसटी अधिकाऱ्यांकडे बाह्य विवरणपत्र (जीएसटीआर-१) दाखल करता येणार नाही. वस्तू आणि सेवा करातील (जीएसटी) बोगस आणि फसव्या नोंदणीच्या समस्येला प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी आणि नोंदणी प्रक्रिया बळकट करण्यासाठी जीएसटी परिषदेने गेल्या वर्षी अशी प्रणाली रिझर्व्ह बँकेने प्रायोगिक तत्त्वावर दोन राज्यांमध्ये राबवली होती. आता याबाबतची घोषणा रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी केली आहे.

## बदलापूर प्रकरणात सुनावणी : हायकोर्टाचा सवाल

### 'सातच्या आत घरात'चा आग्रह फक्त मुलींसाठीच का?

महाराष्ट्र न्युज नेटवर्क


**मुंबई : मुलांना महिलांचा आदर करायला शिकवा. मुलींसाठीच केवळ सातच्या आत घरात का? मुलांना का नाही सातच्या आत घरात यायला सांगत? समानता शिकवली नाही तर कितीही कायदे असले तरी ते मदतीला येणार नाहीत, अशा कठोर शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने बदलापूरप्रकरणी उद्विग्नता व्यक्त केली.**



बदलापूर येथील शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराबाबत स्वयंप्रेरणेने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर मंगळवारी सुनावणी सुरू झाली. अशा कृत्यांना प्रतिबंध घालण्यासाठी काय उपाययोजना आखण्यात याव्यात, याची शिफारस रण्याकरिता समिती नियुक्त करण्यासाठी काही नावे सुचविण्याची सूचना न्या. रेवती मोहिते डेरे व न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने महाअधिवक्ता बीरेंद्र सराफ यांना केली.

मुलांना लिंगसमानतेबाबत जागरूक करण्याचे काम समितीने करावे, असे न्यायालयाने सुचविले. आपण नेहमीच पीडितांबद्दल बोलतो, पण काय बरोबर, काय अयोग्य, हे मुलांना का शिकवत नाही? मुलांनी काय करू नये, हे तुम्हाला सांगावे लागेल, असेही खंडपीठाने म्हटले. मुले लहान असतानाच त्यांची मानसिकता बदलण्याची गरज आहे. त्यांना इतर महिलांचा आदर करणे शिकवा. आम्हाला नैतिकतेचे पाठ दिले जायचे. आता शिक्षण विभागाने पुढाकार घेऊन लहान मुलांमध्ये लिंगसमानतेच्या या बीज रुजवाव्या, असेही न्यायालयाने सुनावले. शाळांबरोबर घरातही मुलांवर समानतेचे बीज रुजविणे आवश्यक आहे. जोपर्यंत मुलांना समानतेविषयी घरी शिकवले जात नाही तोपर्यंत काहीही होणार नाही. आपण आजही पुरुषी अराजकता आणि पुरुषी वर्चस्वासह काम करतो.जनजागृती केली नाही तर कितीही कायदे असले तरी मदतीला येणार नाहीत. सर्वांत वाईट म्हणजे सोशल मीडियाचा वापर... 'सातच्या आत घरात' असा एक मराठी चित्रपट आला होता. असे चित्रपट मुलींसाठी का? मुलांसाठी का नाही? मुलांनाही लवकर घरी यायला सांगा, असे मत व्यक्त करण्यात आले आहे. सुनावणीदरम्यान बीरेंद्र सराफ यांनी खंडपीठाला सांगितले की, कायद्यातील तरतुदी आणि त्याची अंमलबजावणी पाहण्यासाठी स्वयंसेवी संस्था, शाळा आयुक्त, शिक्षण आयुक्त आणि महिला व बाल विभागाचे प्रतिनिधी आदींचा समावेश असलेली समिती नेमण्यात आली आहे. याबाबत २३ ऑगस्ट रोजी सरकारी ठराव मंजूर करण्यात आला आहे. पोक्सोमध्ये मुलांचाही समावेश करायला हवा. अधिसूचनेत केवळ मुलींचा उल्लेख आहे. पोलिसांनी कायद्याची अंमलबजावणी केली नाही. प्राथमिक तपासात त्रुटी आहेत. पोलिसांनी पीडितेला व तिच्या पालकांना पोलिस ठाण्यात जबाब नोंदविण्यासाठी बोलाविले, हे असंवेदनशील आणि कायद्याच्या विरोधात आहे, असे खंडपीठाने म्हटले.

तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती महाअधिवक्ता बीरेंद्र सराफ यांनी न्यायालयाला दिली. आरोपीची ओळख परेड झाल्याचेही ते म्हणाले.



## अजित पवार यांच्या हस्ते पूरग्रस्तांना मदतीच्या धनादेशाचे वाटप

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शासकीय विश्रामगृह येथे पूरग्रस्तांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या मदतीच्या धनादेशाचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले. अनुदानाची रक्कम सर्व कुटुंबांच्या बँक खात्यावर जमा होणार आहे.**

या वेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, उपविभागीय अधिकारी स्नेहा किसवे, यशवंत माने, तहसीलदार किरण सुरवसे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे आदी उपस्थित होते.

नागरिकांनी पूर परिस्थितीत अधिक दक्षता घ्यावी आणि प्रशासनाला सहकार्य करावे. खडकवासला धरणातून विसर्ग सोडल्यावर नदीपात्रात प्रवाहाला अडथळा येणार नाही यासाठी महानगरपालिकेने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना श्री. पवार यांनी या वेळी दिल्या.

जुलै २०२४ मध्ये अतिवृष्टी व वादळवाऱ्यांमुळे जिल्ह्यात अनेक नागरिकांचे नुकसान झाले होते. ज्या घरात पाणी शिरले अशा कुटुंबांना प्रशासनातर्फे मदतीचे वाटप सुरू करण्यात आले आहे. शासनाने विशेष बाब म्हणून प्रती कुटुंब ५ हजारऐवजी १० हजार रुपये अनुदान देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार पुणे शहरातील ७ हजार ९७७ कुटुंबांना ७ कोटी ९७ लाख ७० हजार, हवेली तालुक्यातील ६८२ कुटुंबांना ६८ लाख २० हजार, पिंपरी चिंचवड शहरातील ७ हजार ५१९ कुटुंबांना ७ कोटी ५१ लाख ९० हजार आणि मुळशी तालुक्यातील ९० कुटुंबांना ९ लाख रुपये अनुदान देण्यात येत आहे. याशिवाय विजेचा झटका लागून मयत झालेल्या दोन व्यक्तींच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी १० लाख, तर मुळशी तालुक्यातील आदरवाडी येथे दरड कोसळून मयत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना ४ लाखांचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

# दुचाकी मालिकेतील आकर्षक क्रमांक तिप्पट शुल्क भरून राखून ठेवता येणार

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरू करण्यात येत आहे. या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक तीनपट शुल्क भरून खासगी चारचाकी वाहनांसाठी राखून ठेवण्यासाठी तसेच उर्वरित क्रमांकाबाबत दुचाकींसाठी आगाऊ अर्ज स्वीकारण्याची व लिलाव कार्यपद्धतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.**



नव्याने सुरू होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक चारचाकींसाठी हवे असलेल्या वाहन मालकांनी विहित तीनपट शुल्कासह २७ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा. एकाच क्रमांकाकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्याची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. लिलावाचे धनाकर्ष (डीडी) २८ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारले जातील. त्याच दिवशी दुपारी ४ वाजता सहकार सभागृहामध्ये लिलाव करण्यात येईल.

दुचाकी वाहन मालकांनी आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरून हवे असल्यास २८ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत अर्ज करावा. एकाच क्रमांकाकरीता एकापेक्षा जास्त अर्ज असल्यास त्याची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. लिलावाचे डीडी २९ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारले जातील. प्राप्त अर्जांचा लिलाव त्याच दिवशी दुपारी ४ वाजता सहकार सभागृहामध्ये करण्यात येईल. अर्ज कार्यालयाच्या खासगी वाहन नोंदणी विभागात डीडी, पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधार कार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी 'आर.टी.ओ.,पुणे' यांच्या नावे राष्ट्रीयीकृत, अनुसूचित बँकेचा पुणे येथील असावा. एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर न केल्यास राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप संपुष्टात येतो. तथापि, आता एनआयसी संकेतस्थळामार्फत या प्रक्रियेमध्ये बदल झाला असून वैधता संपलेले पसंती क्रमांक हे नागरिकांना पसंती क्रमांकाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे दिसतात.

सहायक रोखपाल यांच्याकडे 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राध्यान्य' या तत्वानुसार अर्ज करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीला पसंती क्रमांक जारी करण्यात येत आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणेच्या कार्यक्षेत्रातील वाहनधारकांनीच अर्ज सादर करावेत, कार्यक्षेत्राबाहेरील अर्ज, चुकीच्या रकमेचा डीडी जोडलेले तसेच अचूक मोबाईल क्रमांक न लिहिलेले अर्ज बाद ठरविण्यात येतील. वरील कालावधीमध्ये व पुढे त्यावेळी अस्तित्वात असलेले शुल्क लागू राहणार असल्याचे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.

# राज्यात महिला, मुली असुरक्षित, सरकार अपयशी

## प्रशांत जगताप : आरोग्य विश्वास पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : आरोग्य विद्या प्रसारक मंडळ पुणे, विश्वास इन्स्टिटयूट ऑफ पॅरामेडिकल कॉलेज सायन्स यांना तिसरा राज्यस्तरीय विश्वास पुरस्कार वितरण सोहळा हडपसर येथील नोबेल एचएमए भवन येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. प्रसाद कोद्रे होते.**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, पदवीधर जिल्हाध्यक्ष प्रवीण आल्हाट, किरण गाडेकर आदी मान्यवर या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. या वेळी राज्यस्तरीय क्रिडा विभाग विजय कोद्रे, नारी शक्ती अश्विनी शेवाळे, कृषी सागर मेमाणे, सामाजिक डॉ. गणेश राख, कला आरजे अभय, आरोग्य स्वाती आंबेकर, उद्योग महेश जाधव, तसेच गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कुणाल ठाकरे, प्रतीक कांबळे, सागर बुलाखे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

नियोजन प्रसाद शिंदे, तीर्थराज शिंदे, प्रफुल्ल कोद्रे, विजय साळवे, महेश घुले,दर्शन इशी, संदीप मेमाणे, नम्रता बारवकर, प्रथमेश देवकर, गौरी तावरे, पांडुरंग बन्नर, प्रतीक्षा चव्हाण यांनी केले. विद्यार्थ्यांना रोजगार व स्वावलंबी करण्याचे काम आरोग्य विद्या प्रसारक मंडळ करत असल्याचे आयोजक ॲड. प्रसाद कोद्रे यांनी सांगितले. महिला सुरक्षा महत्वाची असून राज्यातील कायदा सुव्यवस्था बिघडली आहे, विद्यार्थी भयभीत असून मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री अपयशी ठरले आहेत, महायुती सरकार हद्दपार करण्याची वेळ आली आहे असे सांगून ॲड. प्रसाद कोद्रे यांच्या संस्थेच्या कार्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी कौतुक केले. सूत्रसंचालन सावली थोपटे यांनी केले, तर आभार नम्रता बारवकर यांनी मानले. आरजे अभय यांनी विद्यार्थ्यांचे चांगलेच मनोरंजन केले. नृत्य करून मुला-मुलींनी मुक्त आनंद घेतला.

# सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कारासाठी 25 सप्टेंबरपर्यंत मुदत

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : जिल्ह्यातील ग्रंथालयांनी राज्यस्तरीय 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार' तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांनी 'डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता' आणि 'सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार' यासाठी २५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.**



राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत, ग्रंथालयांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार', तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने "डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार' देण्यात येतो.राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील 'अ', 'ब', 'क', 'ड' वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख रुपये, ७५ हजार रुपये, ५० हजार रुपये आणि २५ हजार रुपये व सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, ग्रंथभेट आणि रोख रक्कम देऊन गौरवण्यात येते. तसेच, उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक यांना प्रत्येकी ५० हजार रुपये आणि महसुली विभागातील ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक यांना प्रत्येकी २५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, ग्रंथभेट आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात येते. या पुरस्कारांसाठीचे अर्ज तीन प्रतींमध्ये जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे पाठविण्याचे आवाहन राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.




# बिबवेवाडीत गटार होडी आंदोलन

## रामविलास माहेश्वरी यांचा पुढाकार

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : बिबवेवाडी रस्त्यावरील महेश सोसायटी चौकात पडलेल्या खड्ड्यांमुळे अनेक अपघात होत असून नागरिकांना त्याचा मोठा त्रास होत आहे. या ठिकाणी ड्रेनेजची व्यवस्था अतिशय बिकट झालेली असून ड्रेनेजमधून घाण पाणी थेट रस्त्यावर वाहत असते याकडे प्रशासन डोळेझाक करत असल्यामुळे महाविकास आघाडीच्या वतीने गटार होडी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये माजी आमदार मोहन जोशी, नितीन कदम, अभय छाजेड, बाळासाहेब ओसवाल, जयकुमार ठोंबरे, राजेंद्र पायगुडे, सुनील बगाडे, संजय सोनिगरा, गणेश हनमघर, रफ़ीक आलमेल, द स पोलेकर, महाविकास आघाडीचे नेते सर्व कार्यकर्ते स्थानिक नागरिक उपस्थित होते. काँग्रेस पक्षाचे नेते रामविलास माहेश्वरी यांनी याचे आयोजन केले होते.**

# साखर उद्योगाला दिलासा, इथेनॉल उत्पादनावरील निर्बंध उठविले

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : केंद्र सरकारने उसाचा रस, साखरेचा पाक आणि बी आणि सी हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल निर्मिती करण्यावरील बंदी गुरुवारी (२९ ऑगस्ट) उठवली असून, आगामी गळीत हंगामात इथेनॉल उत्पादनावर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. या निर्णयामुळे साखर उद्योगाला दिलासा मिळाला आहे.**



केंद्र सरकारच्या ग्राहक कल्याण आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाने सहा डिसेंबर २०२३ पासून इथेनॉल उत्पादनावर निर्बंध घातले होते. त्याचा मोठा आर्थिक फटका साखर कारखान्यांना बसला होता. साखर कारखान्यांनी इथेनॉल प्रकल्पांसाठी सुमारे ५० हजार कोटींची आर्थिक गुंतवणूक केली होती. ही गुंतवणूक अडचणीत आली होती. त्यामुळे हे निर्बंध उठवावेत, यासाठी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ आग्रही होता. १० ऑगस्ट रोजी दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांच्याकडे निर्बंध उठविण्याची मागणी केली होती. आगामी गळीत हंगामात उसाचा रस, साखरेचा पाक, बी हेवी मोलॅसिस, सी हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल उत्पादन करता येणार असल्याचे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले. या निर्णयामुळे साखर उद्योगाला दिलासा मिळणार आहे. देशातील पाच कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीचे पैसे देता येतील. अतिरिक्त साखर उत्पादन होणार नाही, असे हर्षवर्धन पाटील यांनी स्पष्ट केले.

# वस्तू व सेवा कर भवन नूतन प्रशासकीय इमारतीचे अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : येरवडा येथे वस्तू व सेवा कर भवन, नूतन प्रशासकीय इमारतीचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण करून उद्घाटन करण्यात आले.**



या वेळी आमदार सुनील टिंगरे, राज्य कर आयुक्त आशिष शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, विशेष राज्य कर आयुक्त अभय महाजन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक राजेश पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अपर राज्यकर आयुक्त धनंजय आखाडे, उमाकांत बिराजदार आदी उपस्थित होते.

उद्घाटनानंतर उपमुख्यमंत्री पवार यांनी इमारतीतील दालनांची पाहणी केली. मुख्य अभियंता अतुल चव्हाण आणि वास्तुविशारद यांनी इमारतीतील सुविधांची पवार यांना माहिती दिली. उपमुख्यमंत्र्यांनी या वेळी इमारतीतील फर्निचर, दरवाजे, स्वच्छता आदींच्या अनुषंगाने सूचना दिल्या. याप्रसंगी पुणे विभागाचे राज्यकर सहआयुक्त प्रकाश पोटे, राजेंद्र अडसूळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहिर आदी उपस्थित होते.

## नवीन विस्तारित प्रशासकीय इमारतीचे वैशिष्ट्ये

ही इमारत तळमजला अधिक ४ मजल्यांची असून इमारतीच्या संकल्पनानुसार अजून ४ मजले वाढवता येऊ शकतील. इमारतीसाठी ६७ कोटी २३ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. एकूण विक्रीकर भवनाचे क्षेत्रफळ २ लाख ६३ हजार ८२५ चौरस फूट असून जुन्या इमारतीचे १ लाख ३८ हजार ५८६ चौ.फू. तर नवीन इमारतीचे क्षेत्रफळ १ लाख १५ हजार २४४ चौ.फू. आहे. वापरण्यात आलेले क्षेत्रफळ ९५ हजार ४७२ चौ.फू. आहे. प्रकल्पात १५४ चारचाकी पार्किंग, ४०० दुचाकी पार्किंग व्यवस्थेचे दुमजली बेसमेंट बांधकाम, प्रशासकीय कार्यालयासाठी तळमजला अधिक ४ मजले, अद्ययावत फर्निचरसह अधिकारी, कर्मचारी यांची दालने. अधिकाऱ्यांसाठी १६० दालने, ६०० कर्मचाऱ्यांची बसण्याची संख्या, ७० नागरिकांसाठी प्रशस्त अद्यावत बैठक हॉल व २ लहान बैठक हॉल, प्रत्येक मजल्यावर १५० अधिकारी, कर्मचारी यांना बसण्यासाठी आसनव्यवस्था, तळमजल्यावर १२ हजार चौरस फुटाचा अभिलेख कक्ष, प्रशस्त अभ्यागत दालन व चार उद्वाहन अशी व्यवस्था आहे. विक्रीकर भवनाची सध्याची इमारत १९९९ साली बांधण्यात आलेली आहे. जुलै २०११ मध्ये झालेल्या विक्रीकर खात्याच्या पुर्नरचनेनुसार तसेच वस्तू व सेवा कर कायदा अंमलात येत असल्याने अधिकारी व कर्मचारी यांच्या संख्येत आणखी सुमारे ३० टक्के वाढ होणार असल्यामुळे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सप्टेंबर २०११ मध्ये या सध्याच्या प्रशासकीय इमारतीस लागून पूर्व बाजूस एक नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्ताव त्वरीत सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

# प्राचार्या के. डी. धावणे यांना दलितमित्र गौरव पुरस्कार प्रदान

## अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बार्शी येथे पुरस्कार सोहळा

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**बार्शी : दलित महासंघाच्या वतीने साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय दलितमित्र गौरव पुरस्कार महाराष्ट्र विद्यालय बार्शीच्या प्राचार्या के. डी. धावणे यांना दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह, बार्शी येथे सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.**



या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी केले, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार राजेंद्र राऊत हे होते. यावेळी जयवंत बोधले महाराज, तहसीलदार एफ. आर. शेख, अप्पर तहसीलदार वृषाली केसकर, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, नगर पालिका बार्शीचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, वकील संघाचे अध्यक्ष काकासाहेब गुंड, डॉ. अजित आव्हाड, नवनाथ चांदणे, श्रीधर कांबळे, प्रकाश मोहिते, अतुल नलगे उपस्थित होते.

या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्री. बी. वाय. यादव, संस्थेचे उपाध्यक्ष माननीय श्री. नंदन जगदाळे, संस्थेचे जनरल सेक्रेटरी तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी. टी. पाटील, संस्थेचे सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य अरुण देबडवार, संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा समितीचे सदस्य व्ही. एस. पाटील, बी. के. भालके, सर्व संस्था कार्यकारिणी सदस्य, सर्व संस्था सदस्य, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षक एस. सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# बार्शी बाजार समितीसाठी विजय राऊतांसह तिघे अशासकीय सदस्य

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**बार्शी : राज्याच्या पणन मंत्रालयाच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शीचा कारभार पाहण्यासाठी अशासकीय समितीची नेमणूक केली आहे.**


विजय राऊत


शाहूराजे निंबाळकर


ओंकार धायगुडे

अशासकीय समितीच्या अध्यक्षपदी (मुख्य प्रशासक) विजय राऊत (नाना) यांची, तर प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे, तसेच या समितीत शाहूराजे संतोष निंबाळकर व ओंकार नानासाहेब धायगुडे यांचीही सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. निवड होताच मुख्य प्रशासक व प्रशासक यांनी आपला पदभार स्वीकारला. पदभार घेतल्यानंतर बाजार समितीच्या मुख्य कार्यालयामध्ये आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते विजय राऊत आणि सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी बाजार समितीचे माजी सभापती रणवीर राऊत, सचिव तुकाराम जगदाळे, कर्मचारी, बाजार आवारातील सर्व आडते व्यापारी, हमाल, तोलार, चाळणी कामगार व शेतकरी बांधव उपस्थित होते.

## नियुक्तीसाठी पाठवली होती सात नावे

बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत संपल्याने सरकारने सहायक निबंधक उमेश पवार यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली होती. प्रशासकीय मंडळाच्या नियुक्तीसाठी सात नावे पाठवली होती, मात्र नियमात बसणाऱ्या तीन जणांची समिती पणन विभागाने गठित केली आहे.

# भंगार वाहनांच्या बदल्यात नव्या वाहनांसाठी मिळणार सवलत

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**नवी दिल्ली : नवीन वाहन खरेदी करणाऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. जुनी व कालबाह्य झालेली वाहने भंगारात काढून त्याबदल्यात नवे वाहन खरेदी करण्याच्या तयारीत असलेल्या ग्राहकांना नव्या वाहनखरेदीवर १.५ टक्के ते ३ टक्के सवलत देण्यास वाहन कंपन्या तयार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एका बैठकीत दिली.**



नितीन गडकरी यांनी वाहन उत्पादकांची मध्यवर्ती संघटना असलेल्या 'सियाम'च्या शिष्टमंडळासमवेत भारत मंडपम येथे नुकतीच एक बैठक घेतली, त्या वेळी ते बोलत होते. या बैठकीत मंत्रिमहोदयांनी वाहन उत्पादकांपुढील प्रश्न व समस्या समजून घेतल्या. सध्याच्या चक्रीय अर्थव्यवस्थेचे महत्त्व ओळखून तिला गती देण्यासाठी विविध प्रकारच्या व्यावसायिक वाहनांची निर्मिती करणाऱ्या आणि प्रवासी वाहनांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी मर्यादित काळासाठी वाहन खरेदीवर सवलती देण्याची तयारी दर्शवली. परंतु, अशी सवलत वाहन भंगारात काढणाऱ्या व तसे प्रमाणपत्र दाखवून नवे वाहन खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांनाच दिली जाईल, असेही या बैठकीत ठरले. ही माहिती बैठकीनंतर प्रसिद्ध झालेल्या अधिकृत निवेदनात देण्यात आली आहे. व्यावसायिक वाहनांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी मर्यादित काळासाठी सवलत देण्याची तयारी दाखवली आहे. ही सवलत अवजड वाहने भंगारात काढून त्या जागी नवे वाहन खरेदी करणाऱ्या मालवाहतूकदारांना दोन वर्षांसाठी देण्यात येणार आहे. तसेच जुने झालेले प्रवासी वाहन भंगारात काढून त्या जागी नवे प्रवासी वाहन खरेदी करणाऱ्याला एक वर्षासाठी अशी सवलत मिळणार आहे. या सवलतींमुळे विशिष्ट कालावधीनंतर जुन्या झालेल्या वाहनांना भंगारात टाकण्यासाठी लोक स्वतःहून पुढे येतील. यामुळे सुरक्षित, प्रदूषणमुक्त आणि सक्षम वाहने रस्त्यांवर धावतील, याकडे निवेदनात लक्ष वेधण्यात आले आहे.

या बैठकीला सियामचे अध्यक्ष विनोद अगरवाल, मारुती सुझुकी इंडियाचे एमडी व सीईओ हिसाशी ताकेउची, टाटा मोटर्सचे कार्यकारी संचालक गिरीश वाघ, अशोक लेलँडचे एमडी व सीईओ शेनू अगरवाल आणि टीव्हीएस मोटरचे सीईओ के. एन. राधाकृष्णन आदी उपस्थित होते

मारुती सुझुकी इंडिया, टाटा मोटर्स, महिंद्र अँड महिंद्र, गुंदाई मोटर, व्होल्वो आयशर इंडिया, किया मोटर्स, टोयोटा किर्लोस्कर मोटर, होंडा कार्स, जेएसडब्ल्यू एमजी मोटर, रेनॉ इंडिया, निस्सान इंडिया आणि स्कोडा फोक्सवॅगन इंडिया यांनी नव्या कारच्या एक्स-शोरूम किमतीवर १.५ टक्के किंवा २० हजार रुपये सवलत देण्याची तयारी दाखवली आहे. गेल्या सहा महिन्यांत भंगारात काढलेल्या वाहनांच्या बदल्यात वाहन खरेदी करण्याची तयारी दाखवल्यास या कंपन्यांकडून सवलत दिली जाणार आहे. मर्सिडिझ बेझ इंडियाने २५ हजार रुपये सवलत देण्याचे जाहीर केले आहे. लेलँड, महिंद्र अॅड महिंद्र, फोर्स मोटर्स, इसुजू मोटर्स आणि एसएमपी इसुजू या व्यावसायिक वाहन निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी एक्स-शोरूम किमतीवर सवलत देण्याची तयारी दाखवली आहे.



# कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहाच्या सुरक्षेचा घेतला आढावा

## विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर यांनी दिली भेट

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : राज्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह व सुधारसेवा) डॉ. जालिंदर सुपेकर यांनी कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहास भेट दिली. त्यांनी कारागृह परिसरामध्ये वृक्षारोपण करून कारागृह सुरक्षेचा आढावा घेतला.**

मुख्यालयामार्फत या कारागृहास देण्यात आलेले टी. व्ही. संच, ॲलन फोन, ई प्रिझन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग मुलाखतासाठी संगणक संच, वॉशिंग मशिन, वॉकी-टॉकी, किव्हॉस मशिन, झेरॉक्स मशीन इत्यादी वस्तू कार्यान्वित केलेल्या आहेत किंवा नाही याची पहाणी केली. तसेच ॲलन फोन, ई प्रिझन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग मुलाखत या सुविधेचा लाभ कारागृहातील बंदी कशा प्रकारे घेत आहेत यांची प्रत्यक्ष पाहणी करून बंद्यांच्या अडीअडचणी विचारून त्यांचे मार्गदर्शन केले.

भेटीदरम्यान विवेक झेंडे, अधीक्षक कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, पांडुरंग भुसारे, उपअधीक्षक, स्मिता महाडीक, वैद्यकीय अधिकारी, चंद्रशेखर देवकर, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, शैला वाघ, तुरुंगाधिकारी श्रेणी-१ व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

# प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे नेहमीच सहकार्य : ॲड. सुसीबेन शहा

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगातर्फे नेहमीच सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा ॲड. सुसीबेन शहा यांनी केले.**



शिवशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारक पुणे येथे हा सन्मान सोहळा पार पडला. आविष्कार फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामविकासात व ग्रामचळवळीत उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी यशवंत गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाते.

या वर्षीचा महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने सुरू केलेला यशवंत गौरव पुरस्कार बार्शीचे ॲड. विकास जाधव यांना दिला. जाधव यांना सरपंच पदावर कार्यरत असताना कळंबवाडी गावात स्मार्टग्राम सह आदर्श सरपंच व इतर १७ पुरस्काराने सन्मान झालेला आहे तसेच सरपंच परिषदेच्या स्थापनेपासून राज्यभरात ग्रामपंचायत स्तरावर ग्रामविकासाच्या संकल्पना रुजवणे, सरपंच, उपसरपंच यांचे संघटन करून त्यांच्या न्याय, अधिकारासाठी लढा देणे यासाठी गेले अनेक वर्षे त्यांनी नि:स्वार्थपणे काम केले आहे.

ग्रामीण भागाच्या विकासामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी राज्य सरकार केंद्र सरकारसह जिल्हा परिषद पंचायत समिती स्तरावरही शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून ग्रामीण भागाला न्याय मिळवून देण्यासाठी ठोस भूमिका घेतली. वेळप्रसंगी अनेक आंदोलने उभा केली सरकार विरोधी भूमिका घेतली. राज्यातील सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्यांना संघटित करून त्यांच्या हक्क अधिकार व कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी प्रयत्न केले. सरपंचांचा मान व सन्मान वाढवण्यासाठी प्रयत्न केला. सरपंचांना व उपसरपंचांना मानधन मिळवून देण्यात जाधव यांचा सिंहाचा वाटा आहे, त्यामुळेच राज्यातील सरपंचांच्या व उपसरपंचांनी विकास जाधव यांना सरपंच हृदयसम्राट ही पदवी बहाल केलेली आहे. या कार्याची दखल घेऊन अविष्कार फाउंडेशनने या वर्षीचा ग्रामविकासातील सर्वांत मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

या वेळी सुप्रसिद्ध लेखक सुरेश पाटोळे, आविष्कारचे अध्यक्ष संजय पवार, व्याख्याते सचिन वायकुळे, फुलचंद चाटे, धनंजय भावलेकर आदी मान्यवर उपस्थित होते.



# बार्शीचे ॲड. विकास जाधव यांना यशवंत गौरव पुरस्कार प्रदान

## शिवशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारक पुणे येथे सन्मान सोहळा

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**बार्शी : ग्रामचळवळ व सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेत ॲड. विकास जाधव यांना कोल्हापूरच्या आविष्कार फौंडेशनचा राज्यस्तरीय 'यशवंत गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.**

शिवशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारक पुणे येथे हा सन्मान सोहळा पार पडला. आविष्कार फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामविकासात व ग्रामचळवळीत उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी यशवंत गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाते.

यावर्षीचा महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने सुरू केलेला यशवंत गौरव पुरस्कार बार्शीचे ॲड. विकास जाधव यांना दिला. जाधव यांना सरपंच पदावर कार्यरत असताना कळंबवाडी गावात स्मार्टग्राम सह आदर्श सरपंच व इतर १७ पुरस्काराने सन्मान झालेला आहे तसेच सरपंच परिषदेच्या स्थापनेपासून राज्यभरात ग्रामपंचायतस्तरावर ग्रामविकासाच्या संकल्पना रुजवणे, सरपंच, उपसरपंच यांचे संघटन करून त्यांच्या न्याय, अधिकारासाठी लढा देणे यासाठी गेले अनेक वर्षे त्यांनी नि:स्वार्थपणे काम केले आहे. ग्रामीण भागाच्या विकासामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी राज्य सरकार केंद्र सरकारसह जिल्हा परिषद पंचायत समिती स्तरावरही शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करून ग्रामीण भागाला न्याय मिळवून देण्यासाठी ठोस भूमिका घेतली.

# केरळमध्ये महिलाकेंद्रित पर्यटन प्रकल्प राबविणार

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : "केरळमध्ये कुटुंब, मित्रमंडळींसह भ्रमंती आणि 'सोलो ट्रॅव्हलिंग'साठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यातील महिला पर्यटकांचे वाढते प्रमाण लक्षात घेता केरळच्या पर्यटन विभागाने महिलाकेंद्रित प्रकल्पाची आखणी केली आहे. सुरक्षेबरोबरच महिला व्यावसायिकांकडून सुविधा पुरविल्या जात असून, महिलांसाठी आकर्षक सहलींचे नियोजन करण्यात येणार आहे. डिसेंबर २०२५ पासून याची अंमलबजावणी करण्याचा मानस आहे," अशी माहिती केरळच्या पर्यटन विभागाचे उपसंचालक अश्विन पी. कुमार यांनी दिली.**

केरळ राज्याच्या पर्यटन विभागाच्या वतीने गुरुवारी पुण्यात 'पार्टनरशिप मीट'चे आयोजन केले होते. या वेळी अश्विन पी. कुमार यांनी माध्यमांशी संवाद साधून केरळमधील पर्यटनविषयक माहिती दिली.



"केरळमध्ये नागरिक मोठ्या प्रमाणावर 'सोलो ट्रॅव्हलिंग'साठी येतात. यात आता महिलांची संख्याही वाढत आहे. महिला पर्यटकांसाठी केरळ भ्रमंती सोयीची होण्यासाठी विशेष प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. सुरक्षित पर्यटनासाठी पर्यटनस्थळांवरील सुरक्षा वाढविणे, सीसीटीव्ही बसविणे, 'टूरिझम पोलिसिंग' अशा उपाययोजना करण्यात येणार आहेत. यासह निवासाची व्यवस्था, भोजन, प्रवास अशा प्राथमिक सुविधाही महिलाच देतील, असा प्रयत्न आहे. सध्या राज्यातील ६८ पर्यटनस्थळांवर या सुविधा राबविण्याच्या अनुषंगाने अंमलबजावणी सुरू आहे," असे अश्विन पी. कुमार यांनी सांगितले.

"केरळमध्ये भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत आहे. केरळमध्ये २०२४ च्या पहिल्या तिमाहीत (जानेवारी ते मार्च) ५० लाख ३७ हजार ३०७ पर्यटकांनी भेट दिली. मागील वर्षीच्या तुलनेत यात दोन टक्क्यांनी वाढ झाली आहे. मागील वर्षी ७.७८ लाख आणि २०२२ मध्ये ६.२५ लाख महाराष्ट्रातील नागरिकांनी केरळला भेट दिली आहे.

प्रामुख्याने त्रिवेंद्रम, शबरीमला, वायनाड, मुन्नार, अथिरापल्ली धबधबा अशा विविध पर्यटनस्थळांसह किनारपट्टीला महाराष्ट्रातील पर्यटक भेट देतात," असे अश्विन पी. कुमार यांनी सांगितले. पर्यटकांच्या सोयीसाठी 'हेली टुरिझम' या सुविधेचा समावेश करण्यात येणार असून, खासगी व्यावसायिकांबरोबर हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या हेलिकॉप्टर फेरीमुळे प्रवासातील अंतर कमी होऊन अधिकाधिक ठिकाणांना पर्यटक भेट देऊ शकतील. यासह राज्यातील दुर्गम भागातील पर्यटनासाठी 'काराव्हॅन केरळ' ही सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे त्यांनी नमूद केले."


HANDEWADI
TRADE MARKET
आनंदोत्सव
आप सभी को आनंदोत्सव / पंचकल्याणक
महापूजा में आशीर्वाद देने जरूर जरूर आना है,
अगले महीने!
ACTUAL SITE PHOTOS
43 YEARS OF TRUST
ACTUAL SITE PHOTOS
SANGHVI VIRCHANDJI HUKMAJI PARIWAR
JV ENTERPRISES
TIMBER MARKET
SHAPURA CORPORATION
SANJAY & DARSHAN RATHOD
HANDEWADI
TRADE MARKET
RAMESH JAIN
OSIYA TRADING
MARKET YARD
MILKY MIST
NATIONAL BRAND OF INDIA
MANDOT IMPLEX
MOTILAL MANDOT JAIN
HURRY, ONLY FEW PLOTS AVAILABLE
धन्यवाद! आपके भारी प्रतिसाद के लिये
SANTOSH GROUP
TOGETHER WE GROW
43 वर्षो से एक विश्वसनीय नाम
SANTOSH STEELS
Corporate Office:
72, Bhawani Peth,
Opp Vijay Vallabh School,
Gulali Chowk, Pune 42.
94220 32505, 91585 82505
91686 82505
WAREHOUSING PLOTS | IRON & STEELS TRADING | REAL ESTATE | INVESTMENTS | SOCIAL FOUNDATION

# संपादकीय


अभिजित डुंगरवाल

## चुकीला माफी नाही

राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा २६ ऑगस्ट ला कोसळल्यानंतर संपूर्ण राज्यात संतप्त वातावरण निर्माण झाले. अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवरायांची माफी मागितली व त्याचप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना या घटनेबद्दल संपूर्ण राज्याची माफी मागावी लागली. त्यांच्याआधी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व जनतेची माफी मागितली. पण ते या घटनेत कुणालाही माफी नाही. चुकीला माफी नाही. असे ते म्हणाले. ते मात्र शंभर टक्के खरे आहे. कारण या चुकीला जनता खरेच माफ करणार नाही. याचा फटका आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीला बसणार आहे. हे निश्चित. राजकारण करायला इतर मुद्दे आहेत, छत्रपती शिवाजी महाराज आपली श्रद्धा, दैवत आहे, यावर राजकारण करू नये. असे आवाहन शिंदे यांनी केले तरी आता काहीही उपयोग नाही.जे व्हायचे ते होऊन गेले आहे.आता केवळ परिणामाची वाट महायुती ला पहावी लागणार आहे. चांगला मजबूत पस्तीस फूट उंचीचा पुतळा तयार करण्यासाठी किमान दोन वर्षे लागतात. शिवरायांचा पुतळा घाईगडबडीत आठ महिन्यांत तयार करण्यात आला. पुतळ्याचे तुकडे झाल्याने यासाठी वापरण्यात आलेला धातू व त्याच्या जाडीबाबत संशय असल्याची भावना मिरजेतील ज्येष्ठ शिल्पकार विजय गुजर यांनी व्यक्त केली. ती रास्तच म्हणावी लागेल. आतापर्यंत ब्राँझचे हजारो पुतळे तयार केले. मात्र, एकाही पुतळ्याचे वादळवारा किंवा अन्य कारणांनी नुकसान झालेले नाही, असेही गुजर यांनी सांगितले. समुद्रकिनारी पुतळा बसवताना तेथील वाऱ्याच्या वेगाचा अभ्यास करून पुतळ्याला मजबूत आधार द्यावा लागतो. मात्र, मालवण येथील पुतळा कमीत कमी खर्चात काम करण्याच्या अट्टहासामुळे कोसळला असावा. ही शंका चुकीची मुळीच नाही. अननुभवी शिल्पकारावर असे मोठे काम सोपवणे ही मोठी चूक होती आणि ती या सरकारला मान्यच करावी लागेल.

प्रत्यक्ष पुतळा तयार करणे जितके महत्त्वाचे, तेवढेच तो उभा करणार असलेल्या जागेवरचा चबुतरा, त्याचे बांधकाम, पाया हेही महत्त्वाचे. खरे तर तेच महत्त्वाचे. पुतळा कितीही चांगला तयार, केला आणि हे काम कमकुवत असेल तर त्याचा काहीच उपयोग नाही. पुतळा जेवढा उंच तेवढाच तो बसवण्याच्या जागेचा पायाही खोल असणे आवश्यक आहे. तसा तो घेतला जात नाही आणि दोष पुतळ्यावर येतो.उंच पुतळ्यांच्या कामात त्याच्या आतील जो सांगाडा (आर्मिचर) असतो, तोही महत्त्वाचा, असतो. त्यात सळ्या, गर्डर्स वापरले जातात. ते उच्च दर्जाच्या स्टिलचे असायला हवेत. पुतळ्याच्या कामातील धातूचेही तेच आहे. हा धातूही उच्च दर्जाच्या स्टिलचा हवा, तरच तो गंज धरत नाही. राजकोट मधील पुतळ्याबाबत हा आभ्यास झाला नसावा.असे दिसून येत आहे.

राजकोटमध्ये शिवरायांचा पुतळा कोसळला आणि देशभर संतापाची लाट उसळली. या घटनेसंदर्भात फक्त शिल्पकाराला दोष दिला जातो आहे. मात्र, ज्यांना सरकारी कामाची पद्धत माहिती आहे, त्यांना मात्र यात खरे दोषी कोण? ते बरोबर समजले आहे. याचे कारण निविदांपासून सर्व गोष्टीत कोणाची परवानगी, कोणाची स्वाक्षरी महत्त्वाची असते? कामाची प्रत्येक टप्प्यावर कोणी पाहणी करावी? विशेषतः बांधकामाचा जो भाग आहे, त्याकडे कोणी काळजीपूर्वक पाहावे? हे स्पष्ट आहे. तसे होत नाही. ते सुटतात व दुसरेच कोणी अडकतात. पुतळे उभे करायचे म्हणजे एखादी इमारत बांधण्यासारखाचं प्रकार असतो. यात वेगवेगळ्या शाखांतील अनेक माणसे गुंतलेली असतात. अशी भावना भगवान रामपुरे या शिल्पकारानी व्यक्त केली आहे. प्रत्यक्ष पुतळा तयार करणे जितके महत्त्वाचे, तेवढेच तो उभा करणार असलेल्या जागेवरचा चबुतरा, त्याचे बांधकाम, पाया हेही महत्त्वाचे. खरे तर तेच महत्त्वाचे. पुतळा कितीही चांगला तयार, केला आणि हे काम कमकुवत असेल तर त्याचा काहीच उपयोग नाही. पुतळा जेवढा उंच तेवढाच तो बसवण्याच्या जागेचा पायाही खोल असणे आवश्यक आहे. तसा तो घेतला जात नाही आणि दोष पुतळ्यावर येतो. या राजकोटमधील पुतळा पडण्यामागच्या या सर्व कारणांची तपासणी झालीच पाहिजे आणि दोषींना शिक्षा ही झालीच पाहिजे... ही जनभावना आहे. त्याकडे शासनाला दुर्लक्ष्य करून चालणार नाही. आणि समजा शासनाने काहीच केले नाही तर सर्वसामान्य जनता शासनाला कधीच माफ करणार नाही. कारण या शिवरायांच्या राज्यात चुकीला माफी नाही. नाही म्हणजे नाहीच.

# किती वाट पाहू? कधी मिळणार मला प्रमोशन?

## उपजिल्हाधिकाऱ्यांना सेवाज्येष्ठतेच्या यादीची प्रतीक्षा

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**मुंबई : किती वाट पाहू ? कधी मिळणार मला प्रमोशन ?... असे प्रश्न आता शासनाचे वरिष्ठ अधिकारी विचारू लागले आहेत. राज्यातील उपजिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील अनेक पदे रिक्त असून, गेल्या तीन वर्षांपासून या संवर्गातील ज्येष्ठता यादी जाहीर करण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे.**




उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठानेही या संदर्भातील याचिका निकाली काढली आहे. त्यामुळे आता सेवा ज्येष्ठतेची यादी जाहीर होण्याची उपजिल्हाधिकारी आणि अपर जिल्हाधिकाऱ्यांना प्रतीक्षा लागली आहे.

राज्यात सध्या उपजिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकाऱ्यांची पदे रिक्त असताना दुसरीकडे सेवा ज्येष्ठतेची यादीही प्रसिद्ध झालेली नाही. त्यामुळे रिक्त पदे भरण्यात अनेक अडथळे येत आहेत. या संदर्भात मध्यंतरी प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांना निवेदने देऊन पदे भरण्याची मागणी करण्यात आली होती. पदे न भरल्यास दोन सप्टेंबरपासून आंदोलनाचाही अधिकारी वर्गाने इशारा दिला आहे. ज्येष्ठता सूचीनुसार राज्यात तीनशेहून अधिक पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपजिल्हाधिकारी आणि अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण आहे. त्यांच्या पदोन्नत्या रखडल्याने तहसीलदार, नायब तहसीलदार यांच्याही पदोन्नत्या प्रलंबित आहेत. त्यामुळे महसूल सहायक ते वरिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक ते नायब तहसीलदार, तलाठी ते मंडळ अधिकारी आणि मंडळ अधिकारी ते नायब तहसीलदार आदी सुमारे चार हजार अधिकारी-कर्मचाऱ्यांवर परिणाम होत आहे. दुसरीकडे उपजिल्हाधिकारी वर्गातील अधिकाऱ्यांमध्ये सेवाज्येष्ठता कधीपासून ग्राह्य धरावी याबाबत वाद उफाळला आहे. हा वाद उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल झाला. या पार्श्वभूमीवर दोन्ही गटांनी दाखल केलेल्या याचिका निकाली काढण्यात आल्या आहेत. खंडपीठाने राज्य सरकारच्या बाजूने निकाल दिला आहे.

त्यामुळे उपजिल्हाधिकारी आणि अपर जिल्हाधिकारी पदावरील अधिकाऱ्यांची सेवाज्येष्ठतेची यादी प्रसिद्ध करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सेवाज्येष्ठतेनुसार अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांची प्रारूप निवड यादी तयार करण्यात आली आहे. त्या यादीवर महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वाक्षरी केल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.






'महाराष्ट्र न्युज नेटवर्क' हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अभिजित ताराचंद डुंगरवाल यांनी कल्याणी कार्पोरेशन, १४६४, सदाशिव पेठ, पुणे -४११०३० येथे छापून ऑफिस नं. ३०१ तुलसी अपार्टमेंट, महावीर पार्क जवळ, स्वामी समर्थ नगर, काकडे वस्ती, कोंढवा बु., पुणे -४११०४८. येथे प्रसिद्ध केले. प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

"Maharashtra News Network" Weekly Publication is Owner, Publisher, Editor Abhijit Tarachand Dungarwal, Printed at Kalyani Corporation, 1464, Sadashiv Peth, Pune : 411 030 and Published at Office No. 301, Tulsi Apts., Near Mahavir Park, Swami Samarth Nagar, Kakde Wasti, Kondhwa BK., Pune - 411 048. Editor, Printer & Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Pune court Mo. : 9923133815

# मालवणमधील शिवरायांचा कोसळलेला पुतळा पुन्हा उभारणार

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**मालवण : सिंधुदुर्ग किल्ल्यात मालवण राजकोट येथे आठ महिन्यांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनावरण केलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा सोमवारी दुपारी अचानक कोसळला.**

त्याचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटले आहेत. हा पुतळा पुन्हा उभारण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. शिवप्रेमींमध्ये आणि राजकीय वर्तुळात त्याचे संतप्त पडसाद उमटले.

या प्रकाराची गंभीर दखल घेऊन सिंधुदुर्गचे पालकमंत्री आणि सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी संबंधितांवर गुन्हा नोंदवण्याचा आदेश दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून



किनारपट्टी भागात वादळी वारे आणि मुसळधार पाऊस सुरू आहे. सोमवारी (दि. २६) वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरू असताना राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला. हा प्रकार लक्षात घेता, स्थानिकांनी याबाबत प्रशासनाला माहिती दिली. शिवप्रेमींनी राजकोट येथे धाव घेतली. तहसीलदार वर्षा झालटे, नायब तहसीलदार गंगाराम कोकरे, पोलिस निरीक्षक प्रवीण कोल्हे हेही घटनास्थळी दाखल झाले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सिंधुदुर्ग जिल्हाभरातून पोलिसांची जादा कुमक मागवण्यात आली. पुतळ्याच्या ठिकाणी प्रवेशास प्रतिबंध करण्यात आला आहे. नौदल दिनानिमित्त चार डिसेंबर २०२३ रोजी पंतप्रधानांच्या हस्ते शिवरायांच्या या ३५ फूट उंच पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते.

पुतळा पडण्याची घटना दुर्दैवी आहे. ताशी ४५ किमी वेगाच्या वाऱ्यामुळे हे नुकसान झाले. नौदलासह आमचे अधिकारी घटनास्थळी जाऊन पाहणी करणार आहेत. शिवछत्रपतींचा पूर्णाकृती पुतळा त्याच ठिकाणी दिमाखात मजबूतीने उभा करण्याचे काम आम्ही करू, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी मे. आर्टिस्टीया कंपनीचे मालक जयदीप आपटे, सल्लागार चेतन पाटील यांच्यासह संबंधितांवर गुन्हे नोंदवण्याचा आदेश देण्यात आला आहे. या घटनेनंतर आमदार वैभव नाईक यांनी मालवण येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाची तोडफोड केली. 'आठ महिन्यांतच पुतळा कोसळला, ही दुर्दैवी बाब आहे. पुतळ्याची देखभाल करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होती, मग हा प्रकार पहिला कसा?' असा प्रश्न त्यांनी केला. या घटनेमुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, पुतळा उभारणीच्या कामात असलेल्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्याचा आदेश सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिला.

# पुणे विद्यापीठात मिळणार मोडी लिपीचे प्रशिक्षण

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : 'मोडी लिपी'चे पारंपरिक ज्ञान जतन करून पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाने छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेसोबत (सारथी) 'मोडी लिपी प्रशिक्षण' साठी करार केला आहे.**

करारावर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि 'सारथी' संस्थेचे उपव्यवस्थापकीय संचालक अनिल पवार यांनी स्वाक्षरी केली. 'इतिहास विभागाकडून गेली दोन दशके विविध समाजघटकांना मोडी लिपीचे



प्रशिक्षण दिले जात आहे. आता 'सारथी' संस्थेसोबत मोडी लिपी प्रशिक्षणासाठी करार केल्यामुळे आपला ऐतिहासिक वारसा समजून त्याचा अन्वयार्थ लावण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होईल,' असा विश्वास डॉ. गोसावी यांनी व्यक्त केला.

विद्यापीठाच्या इतिहास विभागात 'मोडी लिपी आणि कागदपत्रांचा चिकित्सक अभ्यास' हा अभ्यासक्रम आहे. वीस विद्यार्थ्यांची एक तुकडी 'सारथी' संस्था प्रायोजित करेल आणि विद्यापीठाचा इतिहास विभाग विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करेल, असे या कराराचे स्वरूप आहे. पवार यांनी 'सरसेनापती हंबीरराव मोहिते सारथी मोडी लिपी प्रशिक्षण प्रकल्प' या अंतर्गत राज्यातील विविध विद्यापीठांसोबत मोडी लिपी प्रशिक्षणासाठी करार केल्याची माहिती दिली. 'व्यापक दृष्टिकोनातून विचार करता सारथी संस्था मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक हितासाठी योजना राबवित आहे. त्या समाजाचा इतिहास जाणून घेण्यासाठीही मोडी लिपीचे प्रशिक्षण गरजेचे आहे. त्यासाठीच हा प्रकल्प राबविला जात आहे,' असे पवार यांनी सांगितले.

# मुंबईत म्हाडाच्या घरांच्या किमती कमी होणार

## सर्वसामान्यांना मिळणार दिलासा

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**मुंबई : म्हाडाच्या घरांच्या किमती आवाक्याबाहेर असल्याने अर्ज करायचा की नाही, या द्विधा मनःस्थितीत असलेल्या ग्राहकांना गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांनी खुशखबर दिली आहे. म्हाडाच्या घरांच्या किमती १० ते २५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात येणार असल्याची घोषणा सावे यांनी केली आहे, तसेच म्हाडाच्या घरांसाठी अर्ज करण्याची मुदत १९ सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.**

म्हाडातर्फे मुंबईत निर्माण करण्यात आलेल्या 'श्री आणि श्रीमती निवासी' या शुभंकर चिन्हाचे (मॅस्कॉट) अनावरण गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते म्हाडा मुख्यालयात करण्यात आले. ते याप्रसंगी बोलत होते.

या वेळी म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर आदी उपस्थित होते. म्हाडाच्या मुंबई मंडळाने नुकतीच मुंबईतील २,०३० घरांची लॉटरी जाहीर केली आहे. त्यात पुनर्विकास प्रकल्पातून म्हाडाला खासगी



विकसकांकडून मिळालेल्या घरांपैकी ३७० सदनिकांचा या सोडतीत समावेश आहे. मुंबई शहरासह उपनगरांतील या घरांच्या किमती ७० लाख ते साडेसात कोटींपर्यंत आहेत. किमती आवाक्याबाहेर असल्यामुळे या घरांसाठी २० दिवसांत खूप कमी अर्ज आले आहेत. सुधारित किमती मुंबई मंडळाद्वारे लवकरच म्हाडाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार असल्याचे सावे यांनी सांगितले. खासगी विकसकांकडून मिळालेल्या ३७० घरांना हा निर्णय लागू असणार आहे. म्हाडाने जाहीर केलेल्या सोडतीनुसार २,०३० घरांसाठी अर्ज करण्याची ४ सप्टेंबर ही अखेरची मुदत होती, तर १३ सप्टेंबरला घरांची सोडत काढली जाणार होती. आता अर्ज करण्याची मुदत १९ सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आल्यामुळे ही सोडत पुढे जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# दत्ताभाऊ खवळे यांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय : प्रशांत जगताप

## शिवसेना उबाठा दहीहंडी उत्सव उन्नतीनगरमध्ये जल्लोषात साजरा; विविधपक्षीय नेते सहभागी

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उन्नतीनगर गाडीतळ येथे भव्य दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. महिलांच्या नृत्याची पर्वणी, गोपाल भक्तांचा उत्साह यामुळे दहीहंडी जल्लोषात साजरी झाली.**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभागप्रमुख दत्ताभाऊ खवळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित दहीहंडीमध्ये कसबा पेठेतील गोविंदा पथकाने हंडी फोडत तीन लाख रुपयांची रोख रक्कम व सन्मानचिन्ह पटकावले. सिनेअभिनेत्री शीतल ढेकळे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरल्या.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस



शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, माजी नगरसेवक मारुती आबा तुपे, योगेश ससाणे, नितीन गावडे, राष्ट्रवादी काँग्रेस हडपसर अध्यक्ष डॉ. शंतनू जगदाळे, माजी सरपंच संजय हरपळे, विजय भिंताडे, राम बोरकर, सतीश जगताप, पल्लवी प्रशांत सुरसे, शीतल संजय शिंदे, गोपीनाथ पवार, विशाल मिरेकर, विद्या संतोष होडे, संजय सपकाळ, आजिनाथ भोईटे, इम्रान शेख, किरण गाडेकर, संजय डोंगरे, डॉ. बच्चूसिंग टाक, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दहीहंडी उत्सवाचे आयोजन विभागप्रमुख दत्ताभाऊ खवळे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शाखाप्रमुख अनिकेत सपकाळ, उपशाखाप्रमुख कुणाल वाघ, जितू आप्पा कदम, अनिल हावळे, शुभम जाधव, उपशाखाप्रमुख सुरेश दोरी व कार्यकर्त्यांनी केले.

माजी महापौर प्रशांत जगताप यांनी कडव्या शिवसैनिक दत्ताभाऊ खवळे यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

# जप्त केलेली 31 वाहने ज्याची आहेत त्यांनी घेऊन जा

## बिबवेवाडी पोलीस स्टेशनचे आवाहन

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : बिबवेवाडी पोलीस स्टेशन, येथे एकूण ३१ बिनधनी दुचाकी वाहने जप्त आहेत. त्यांची माहिती पुणे पोलीस वेबसाईटवर प्रसिद्ध केली आहे. नागरिकांनी वेबसाईटवर व बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे खात्री करून त्यांची वाहने असल्यास ती ताब्यात घेऊन जावीत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.**



बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे बिनधनी दुचाकींची एकूण ३१ वाहने पंचनाम्याने जप्त करण्यात आली आहेत. सदर वाहनांपैकी काहींच्या मूळ मालकांचा वेळोवेळी शोध घेऊनही, मूळ मालक मिळून आलेले नाहीत, अथवा आजपर्यंत कोणीही हक्क सांगण्यासाठी समोर आलेले नाही. त्यामुळे बिबवेवाडी पोलीस स्टेशनकडून सदर ३१ जप्त वाहनांचे नंबर, चासिस आणि इंजिन नंबर यांची माहिती पुणे शहर पोलीस संकेतस्थळावर दि. २० ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

नागरिकांनी प्रसिद्धी दिनांकापासून पुढील एका महिन्याच्या आत वाहनांचे कागदपत्रांसह बिबवेवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भेट देऊन वाहनांबाबत खात्री करावी, व वाहन ताब्यात घेण्याची पुढील कायदेशीर कार्यवाही करावी, तसेच ज्यावाहनांचे मूळ मालक मिळून येणार नाहीत, त्यावाहनांची कायदेशीर बाबींची पूर्तता करून लिलाव कार्यवाही करण्यात येणार आहे, अशी माहिती बिबवेवाडी वरिष्ठ पोलीस निरीक्षक छगन कापसे दिली आहे.

# शेअर मधून नफ्याच्या आमिषाने 13 लाखांचा गंडा

## हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : शेअरमधून गुंतवणुकीतून मोठा नफा मिळवण्याचे आमिष दाखवून हडपसरमधील एकाची १३ लाखांची फसवणूक झाली आहे. हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनोळखी तरुणाने फिर्यादीशी मोबाईलवर संपर्क साधला.

शेअर्सची माहिती देऊन गुंतवणूक करून चांगला परतावा मिळेल असे आमिष दाखवून फिर्यादींचा विश्वास संपादन केला. त्यांना गुंतवणूक करण्यास भाग पाडून त्यांची १३,७७,०००/- रुपयांची आर्थिक फसवणूक केली.

हा तपास पोलीस निरीक्षक निलेश जगदाळे करीत आहेत.

# अल्पवयीन चोरट्याकडून वाहनचोरीचे सात गुन्हे उघड

## दरोडा व वाहनचोरी विरोधी पथकाची उत्कृष्ट कामगिरी

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : दुचाकी चोरणाऱ्या विधिसंघर्षग्रस्त बालकाकडून एकूण ०७ वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणून एकूण ०३ दुचाकी गाड्या, ०३ ऑटो रिक्षा व ०१ चारचाकी गाडी जप्त करण्यात पुणे शहर पोलिसांच्या दरोडा व वाहनचोरी विरोधी पथकाला यश आले आहे. त्याच्याकडून २,५०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**




दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १ कडील अधिकारी व अंमलदार असे वारजे माळवाडी पोलीस स्टेशन कडील गुन्ह्यातील आरोपी व चोरीस गेलेल्या दुचाकी गाडीचा शोध घेत होते.

पोलीस अंमलदार साईकुमार कारके व पोलीस हवालदार धनंजय ताजणे यांना त्यांचे गोपनीय बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, शनिवार पेठ, पुणे येथे चोरलेल्या ऑटो रिक्षासह एक व्यक्ती थांबला आहे. ऑटो रिक्षा ही चोरीची असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. ऑटो रिक्षाच्या आर. टी. ओ. नंबरवरून माहिती काढली असता ती चोरीची असल्याचे समजले. नमुद विधीसंघर्षग्रस्त बालकाकडे त्याचे पालकांसमक्ष आणून आणखी चौकशी केली असता त्याने ०३ दुचाकी गाड्या, ०३ ऑटो रिक्षा व ०१ चारचाकी गाडी असे चोरी केले असल्याचे सांगितले. विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून एकूण ०७ वाहने जप्त करून वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणले. त्याच्याकडून २,५०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार बिडवई यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक प्रविण काळुखे, पोलीस हवालदार बाळू गायकवाड, प्रदीप राठोड, धनंजय ताजणे, गणेश ढगे, पोलीस नाईक रवींद्र लोखंडे, पोलीस अंमलदार साईकुमार कारके, महेश पाटील, श्रीकांत दगडे, शिवाजी सातपुते, नारायण बनकर यांनी केली आहे.

# मारहाण करून खराडीतील तरुणास लुटले

## येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : खराडीतील एका तरुणास हत्याराचा धाक दाखवून लुटल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तरुणाने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हैद्राबादी हॉटेल, लक्ष्मीनगर, येरवडा येथून फिर्यादी तरुणास दुचाकीवरून आलेल्या तरुणांनी नेले. त्याला मारहाण करून धारदार शस्त्राचा धाक दाखवून त्याच्या गळ्यातील सोन्याची चेन आणि अंगठी, एकूण २५ हजार रुपये किमतीची, चोरून नेली. भरदिवसा ही घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

हा तपास येरवडा पोलिस करीत आहेत.

# आत्महत्या केलेल्या पोलीस महिलेचा मृतदेह सापडला

## आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : इंद्रायणी नदीत उडी मारून आत्महत्या केलेल्या पोलीस महिलेचा मृतदेह अखेर चौथ्या दिवशी सापडला.**



अनुष्का सुहास केदार (वय २०, रा. लक्ष्मीनारायणनगर, दिघी), असे या पोलीस महिलेचे नाव आहे. रविवारी (दि. २५) सायंकाळी सव्वापाचच्या सुमारास केदार यांनी इंद्रायणी नदीच्या नवीन पुलाजवळील गरूड खांबावरून नदीत उडी मारली होती. त्यानंतर आळंदी पोलीस, आळंदी अग्निशमन विभाग, आणि एनडीआरएफ यांच्या पथकाकडून इंद्रायणी नदीत शोधकार्य सुरू होते. अखेर बुधवारी (दि. २८) संबंधित पोलीस महिलेचा मृतदेह गोलेगाव येथील नदीपात्रात आढळून आला आहे. दरम्यान, अनुष्का केदार यांनी नदीत उडी मारण्यापूर्वी तिच्या एका मित्राला फोन केला असल्याची माहिती मिळत आहे.

# शेअरमध्ये नफ्याचे आमिष दाखवून फसवणूक

## हडपसर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने हडपसर ससाणेनगरमधील नागरिकाची २० लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २९ मार्च ते १८ मे दरम्यान हा प्रकार घडला आहे.




अनोळखी तरुणाने फिर्यादीशी मोबाईलवरसंपर्क साधून विश्वास संपादन केला. फिर्यादीस शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल, असे आमिष दाखवले. कोणताही परतावा न देता २०,८७,४००/- रुपये किमतीची आर्थिक फसवणूक केली आहे.

हा तपास पोलीस निरीक्षक नीलेश जगदाळे करीत आहेत.

# मोबाईल टॉवरचे रिमोट रेडिओ युनिट चोरणारा जेरबंद

## सहकारनगर पोलिसांची कामगिरी

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : मोबाईल कंपनींच्या टॉवरवरील महागड्या रिमोट रेडिओ युनिटची चोरी करणारा चोरटा जेरबंद करून त्याच्याकडून ५,७०,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात सहकारनगर पोलिसांना यश आले आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ०८ मार्च रोजी फिर्यादी सागर राजेंद्र मोरे हे नोकरीस असलेल्या एका कंपनीने केदार अपार्टमेंट, संभाजीनगर, धनकवडी पुणे व साई कृपा सोसायटी सहकारनगर पुणे येथे मोबाईल टॉवर बसवले होते. सदर टॉवरवर एका कंपनीने ४ जी नेटवर्कसाठी रिमोट रेडिओ युनिट असे एकूण ९ नग मशीन बसवली होती. त्याची अज्ञात इसमाने चोरी केली होती. त्याबाबत सहकारनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात यापूर्वी अक्षय शांताराम बोडके (वय २६ वर्षे, रा. इंदिरानगर, बिबवेवाडी) आणि अशिष अशोक शिंदे (वय ३९ वर्षे, रा. पापळ वस्ती, बिबवेवाडी) असे दोन आरोपी अटक करण्यात आले होते.

दि. २७ ऑगस्ट रोजी सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे सहकारनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत दहिहंडी सणानिमित्त पेट्रोलिंग करीत असताना पोलीस अंमलदार सागर सुतकर यांना बातमी मिळाली की, मोबाईल टॉवरवरील किंमती मशीन चोरी करणारा एक इसम के. के. मार्केटच्या पुढे भंगाराच्या दुकानाजवळ चोरीच्या रिमोट रेडिओ मशीन पोत्यात घेऊन विक्रीसाठी येणार आहे.

सदरची माहिती सहकारनगर वरिष्ठ पोलीस निरीक्षक छगन कापसे यांना कळविली असता, त्यांनी लगेच सपोनि सागर पाटील व अंमलदार यांची टीम तयार करून कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार, सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांनी जाऊन छापा टाकून आरोपीस त्याच्याकडील पोत्यातील मालासह ताब्यात घेतले. दिलशाद मोहमद रफिक (वय ३२ वर्षे, रा. कुलउत्सव सोसायटी, खड़ी मशिन चौक, कोंढवा पुणे, मुळ उत्तर प्रदेश) याने चौकशी दरम्यान कबूल केले की, सदरचा गुन्हा त्याने आपल्या साथीदार अक्षय बोडके, अशिष शिंदे (दोघे रा. बिबवेवाडी) यांच्यासह केला आहे. त्याच्याकडून गुन्ह्यातील एकूण ५,७०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सहकारनगर पोलिस स्टेशन छगन कापसे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) उत्तम भजनावळे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा पोलीस निरीक्षक सागर पाटील, सहायक पोलीस उपनिरीक्षक बापू खुटवड, पोलीस अंमलदार सागर सुतकर, खंडू शिंदे, अमोल पवार, किरण कांबळे, बजरंग पवार, चंद्रकांत जाधव, महेश मंडलिक, सागर कुंभार, अमित पदमाळे, विशाल वाघ यांनी केली आहे.

# वाहतूक कोंडी सोडवताना तरुणास मारहाण

## लोणीकंद पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : वाहतूक कोंडी सोडवताना दोघांनी तरुणास मारहाण करून त्याच्या अंगावर गाडी घातल्याची घटना तुळापूर आळंदी रोडवर घडली आहे. पोलिसांनी दोघांना अटक करून गुन्हा दाखल केला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २७ ऑगस्ट रोजी रात्री सव्वाअकरा वाजता घडली. फिर्यादी तरुण हा कुरकुंडी (ता. खेड, राजगुरुनगर) त्याच्या मित्रासह जात असताना वाहतूक कोंडी झाली होती. फिर्यादी व त्याचा मित्र जगदीश शिवेकर कोंडी सोडवत होते. त्या वेळी जगदीशने रस्त्यात अडथळा करणाऱ्या तरुणांना रस्त्यातून बाजूला होण्यास सांगितले. यामुळे वाद वाढला. त्याला व मित्रांना मारहाण केली आणि त्याच्या अंगावर गाडी घालून त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न केला. जगदीशच्या पोटाला, तोंडाला आणि छातीला मार लागला. त्यांच्या गाडीचेही नुकसान करण्यात आले.

पोलिसांनी या प्रकरणी गौरव दीपक लगड (वय २२ वर्ष, रा. पाथर्डी, अहमदनगर) आणि अविनाश बनकड शेळके (वय ३८ वर्ष, रा. आळंदी, पुणे) यांना अटक केली आहे.

हा तपास सहायक पोलीस निरीक्षक नीलेश घोरपडे करीत आहेत.

# खडकीत जुन्या वादातून डोक्यात केले वार

## खडकी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : जुन्या वादातून खडकीतील एका तरुणास बेदम मारहाण करून डोक्यात लोखंडी हत्याराने वार करण्यात आले. या प्रकरणी खडकी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास रेल्वे ब्रिजजवळ ही घटना घडली.

फिर्यादीची गाडी अडवून त्याला बाहेर काढून मारहाण केली. त्याच्या डोक्यात लोखंडी हत्याराने वार करण्यात आले. पोलिसांनी या प्रकरणी दोन आरोपींना अटक केली आहे. प्रतीक सपकाळ याला अटक करण्यात आली आहे.

पोलिस निरीक्षक गजानन चोरमले या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

# दुचाकीवरील चोरट्यांनी मंगळसूत्र पळवले

## अलंकार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : दुचाकीवरील चोरट्यांनी पायी जात असलेल्या महिलेचे मंगळसूत्र चोरल्याची घटना घडली आहे.**



या प्रकरणी अलंकार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही महिला २६ ऑगस्ट रोजी पायी जात असताना, दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी महिलेचे ७० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र हिसका मारून पळवून नेले.

याचा तपास पोलीस उपनिरीक्षक घोडके करीत आहेत.

# पीएमपीतील प्रवासी महिलेच्या दागिन्यांची चोरी

## पर्वती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : मांगडेवाडी ते दांडेकर पूल दरम्यान प्रवास करत असताना पीएमपीएमएल बसमधील प्रवासी महिलेच्या दागिन्यांची चोरी झाल्याची घटना घडली आहे.**




मांगडेवाडीतील एका २४ वर्षीय तरुणीने फिर्याद दिली आहे. त्या २७ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास बसने प्रवास करत होत्या.

मांगडेवाडी बस स्टॉपपासून ते दांडेकर पूल बस स्टॉप दरम्यान, बसमधील गर्दीचा फायदा घेत, अज्ञात व्यक्तीने त्यांच्या पर्समधून १,४८,०००/- रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरी करून नेले.

हा तपास महिला पोलीस उपनिरिक्षक तेजस्विनी पवार करीत आहेत.

# राजाराम पुलाजवळ महिलेचे मंगळसूत्र हिसकावले

## वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : राजाराम पुलाजवळ असलेल्या पद्मावती मंदिराकडे जात असताना एका महिलेचे मंगळसूत्र हिसकावून नेल्याची घटना २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास घडली आहे. वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला ६५ वर्षांची आहे. ती मंदिराकडे पायी जात असताना, दुचाकीवरून आलेल्या एका तरुणाने तिच्या गळ्यातील ७५ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र हिसकावून नेले.

# पादचारी युवकाला मारहाण; लुटण्याचा प्रयत्न

## वानवडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : वानवडीतील डोमिनोज पिझ्झा दुकानाच्या जवळून पहाटेच्या सुमारास पायी जाणाऱ्या एका तरुणाला दुचाकीवर आलेल्या दोघांनी मारहाण केली. या प्रकरणी वानवडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी हे पहाटेच्या वेळी पायी चालत जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीस तुझ्याकडे काय आहे ते दे, असे म्हणत धमकी दिली.

फिर्यादी यांनी त्यास विरोध केल्याने दोघांनी त्यांच्याकडील लोखंडी हत्याराने फिर्यादीला डोक्यात मारून जखमी केले. याचा तपास पोलीस उपनिरीक्षक धीरज कांबळे करीत आहेत.

# सराईत गुन्हेगाराचा हॉटेल बिलाच्या वादातून खून

## सिंहगड रोड पोलिसांनी केली दोघांना अटक

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : सिंहगड रोडवर सराईत गुन्हेगाराचा हॉटेल बिलाच्या वादातून खून झाल्याची घटना वडगाव पुलानजीक घडली आहे.**




बिअर बारमधील वादातून वीर बाजी पासलकर पुलाजवळ गुरुवारी मध्यरात्री हा प्रकार घडला आहे. हनुमंत ऊर्फ गोट्या दत्तात्रेय शेजवळ (वय ३४, रा. धायरी फाटा) असे या गुन्हेगाराचे नाव आहे.या प्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी विकास सुभाष मुरकुटे (३८, रा. औंध), विप्लव दुलाल सरकार (४४, रा. क्लासिक गार्डन हॉटेल) यांना अटक केली, तर गणेश ऊर्फ काका कुलकर्णी (३५) याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हनुमंत ऊर्फ गोट्याला २७ जुलै रोजी तडीपार करण्यात आले होते. तो वडगाव पुलाजवळील एका बिअर बारमध्ये मित्रांसमवेत दारू पिण्यासाठी गेला होता. तिथे त्याचे बिलावरून व्यवस्थापक मुरकुटे आणि इतर दोघांशी भांडण झाले. त्यांनी मारहाण केल्यामुळे गोट्याने हॉटेलमध्ये तोडफोड केली. त्या वेळी त्याला हॉटेलबाहेर जाण्यास सांगण्यात आले.

बाहेर गेल्यानंतर पुन्हा झालेल्या भांडणात आरोपींनी गोट्याला मारहाण केली. पंक्चरच्या दुकानातील लोखंडी हातोडीने त्याच्या डोक्यात वार केल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. शुक्रवारी (ता. २३) आरोपींना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने या दोन्ही आरोपींना २९ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. पोलीस निरीक्षक (गुन्हे) राघवेंद्र सिंह क्षीरसागर तपास करीत आहेत.

# हत्यारांचा धाक दाखवून मोबाईलची चोरी

## हडपसर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : वानवडीतील डोमिनोज पिझ्झा दुकानाच्या जाळून पहाटेच्या सुमारास पायी जाणाऱ्या एका तरुणाला दुचाकीवर आलेल्या दोघांनी मारहाण केली. या प्रकरणी वानवडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटना 24 ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास घडल्या. हरपळे वस्ती, फुरसुंगी, शिवशक्ती चौकात फिर्यादी मोबाईलवर बोलत उभे होते. त्यावेळी तीन जणांनी शस्त्राचा धाक दाखवून त्यांचा मोबाईल हिसका मारून पळवला. त्यानंतर चोरट्यांनी आयबीएम कंपनीसमोर एका मुलाचा मोबाईल धाक दाखवून चोरला. पोलीस उपनिरीक्षक विनोद पवार तपास करीत आहेत.

# खुनाचा प्रयत्न केलेला आरोपी चार महिन्यांनंतर पकडला

## विश्रामबाग पोलिसांनी केली अटक

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : नवी पेठ येथे चार महिन्यांपूर्वी मित्राचा खून करण्याचा प्रयत्न केलेला फरार आरोपी पकडण्यात यश आले आहे. विश्रामबाग पोलिसांनी त्याला अटक केली आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्धार्थ दत्तात्रय मोरे याने १४ एप्रिल २०२४ रोजी त्याचा मित्र व फिर्यादी हे जयंती पाहण्यासाठी नवी पेठ येथे आले होते. आपण सोबत जेवण करू असे म्हणून फिर्यादीस दुचाकी चालवण्यास सांगून पाठीमागे बसून घोलप मटन शॉपसमोर पोहोचले. पाठीमागे बसलेल्या आरोपीने पूर्वीच्या भांडणाचा राग मनात धरून धारदार हत्याराने मानेवर वार करून "आज मी तुला सोडणार नाही, तुला खल्लास करतो, तू खूप दिवसांनंतर सापडलास" असे म्हणत फिर्यादीस जिवे मारण्याचा प्रयत्न केला. आरोपी हा गुन्हा नोंद झाल्यापासून फरारी असल्याने आरोपीचा शोध घेण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांनी तपासपथकास आदेश दिला होता. दाखल गुन्ह्याच्या तपासात विश्रामबाग पोलीस स्टेशन येथील अंमलदार सचिन अहिवळे यांनी तांत्रिक विश्लेषणाचे आधारे व गोपनीय खबऱ्याच्या मदतीने आरोपी सिद्धार्थ दत्तात्रय मोरे (वय २६ वर्षे, रा. सेनादत्त पेठ, छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यामागे, पुणे) हा त्याच्या पत्नीस भेटण्यासाठी नऱ्हे येथे येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळवली. त्या ठिकाणी पोलीस उपनिरीक्षक मनोज बरुरे व पोलीस स्टाफ यांनी सापळा रचून शिताफीने सिद्धार्थ याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. ही कारवाई पोलीस निरीक्षक (गुन्हे) अरुण घोडके, पोलीस उपनिरीक्षक मनोज बरुरे, पोलीस अंमलदार सचिन अहिवळे, मयूर भोसले, गणेश काठे, आशिष खरात, अर्जुन थोरात, राहुल मोरे, साताप्पा पाटील, संतोष शेरखाने व सागर मोरे यांनी केली आहे.

# मोबाईलचा ॲक्सेस घेतला, सात लाखांची फसवणूक

## कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : गॅस कनेक्शन बंद करणे व गॅसचे बिल न भरल्याचे सांगणारा मेसेज प्राप्त करून मोबाईलचा ॲक्सेस घेऊन सात लाखांची फसवणूक केली गेली आहे. ही घटना २ जुलै रोजी कोथरूड परिसरात घडली आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७१ वर्षीय महिलेने या प्रकरणी तक्रार दिली आहे.

ऑनलाईन माध्यमाद्वारे फिर्यादी यांना गॅसच्या बिलाची किंमत न भरल्यामुळे गॅस कनेक्शन बंद करण्यात येईल, असे मेसेज प्राप्त झाला.

फिर्यादी यांनी मेसेजमधील मोबाईल नंबरवर कॉल करून एपीके फाईल डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर फाईलमध्ये माहिती भरून मोबाईलचा ॲक्सेस प्राप्त करून घेण्यात आला. यामुळे बँक खात्यातून एकूण ७,१२,१२० रुपये डेबिट करून फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे.

पोलीस निरीक्षक (गुन्हे) विक्रमसिंह कदम या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

# पुण्यात तरुणीचा निर्घृण खून, मृतदेह आढळला नदीपात्रात

## चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पुण्यात एका तरुणीचा निर्घृण खून केल्याचे उघडकीस आले आहे. खराडीतील मुळा-मुठा नदीपात्रात एका तरुणीचा मृतदेह आढळला असून, तरुणीचे हातपाय आणि शिर धडावेगळे करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.**




खून झालेल्या तरुणीची ओळख अद्याप पटलेली नाही. खराडी परिसरात नदीपात्रालगत एका इमारतीचे काम सुरू आहे. तेथील बांधकाम मजुरांनी सोमवारी (ता. २६) सकाळी नदीपात्रात एका तरुणीचा मृतदेह वाहून आल्याचे पाहिले. त्यांनी त्वरित या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तरुणीची ओळख पटू नये म्हणून शिर धडावेगळे करण्यात आले आहे.

पोलिसांनी मृतदेह ससून रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला असून अहवाल अद्याप मिळालेला नाही. तरुणीचे वय अंदाजे १८ ते ३० वर्षे असल्याची माहिती चंदननगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय चव्हाण यांनी दिली. मुसळधार पावसामुळे खडकवासला धरणातून नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाणी सोडले जात आहे. तरुणीचा खून केल्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह पाण्यात टाकून देण्यात आला आहे. मृत तरुणीची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. खून करणाऱ्या आरोपीचा शोध सुरू असून, याप्रकरणी चंदननगर पोलिस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिलेल्या माहितीनुसार खून दोन दिवस आधीच (शनिवारी) झालेला असल्याचा अंदाज आहे. मृतदेहाचे ससून रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले आहे. ओळख पटविण्यासाठी पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील बेपत्तांच्या तक्रारींचा शोध घेतला जात आहे, तसेच पोलीस आरोपीच्या मागावर आहेत.

हा तपास पोलीस निरीक्षक अनिल माने करीत आहेत.

# पोलिसांवर हल्ला करणारे आरोपी सोलापूर पोलिसांनी पकडले

## टेंभुर्णी पोलिसांची कामगिरी : 24 तासांच्या आत कोयता गँगचे आरोपी केले गजाआड

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**सोलापूर : वानवडी पोलीस स्टेशन पुणे येथील सहायक पोलीस निरीक्षक रत्नदीप गायकवाड यांच्यावर धारदार हत्याराने हल्ला करणारे आरोपी हे पुणे येथून खाजगी वाहनाने सोलापूरकडे पळून निघाले असल्याची माहिती सोलापूर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना मिळताच त्यांनी नाकाबंदीचे आदेश दिले व आरोपींना २४ तासांच्या आता टेंभुर्णी पोलिसांनी गजाआड केले.**

याविषयी अधिक माहिती अशी की, पुणे शहरातील सहाय्यक पोलीस निरीक्षक रत्नदिप गायकवाड यांचेवर धारदार हत्याराने हल्ला करणारे आरोपी हे पुणे येथून खाजगी वाहनांने सोलापूरकडे निघाले आहेत, अशी माहिती सोलापूर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तातडीने नाकाबंदी करण्याबाबत सूचना दिल्या. नाकाबंदीमध्ये या कोयता गँगच्या आरोपींना टेंभुर्णी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये एका लक्झरी बसमध्ये पकडण्यात आले. सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा अजित पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली टेंभुर्णी पोलीस स्टेशन कडील प्रभारी पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, सहायक पोलीस निरीक्षक गिरीष जोग, पोलीस उपनिरीक्षक, कुलदीप



सोनटक्के, अजित मोरे, पोलीस हवालदार संदीप गिरमकर, विलास नलवडे, अशपाक शेख, कांतीलाल लाड, पोलीस नाईक प्रवीण साठे, विनोद साठे, पोलीस कॉ. बाळराजे घाडगे, रशिद मुलाणी चालक नितीन डाकवाले असे टिम घेऊन पुणे ते सोलापूर हायवे रोडवरील वरखडे टोल नाका येथे तात्काळ "नाकाबंदी" करून पुणे बाजूकडून सोलापूरकडे जाणारी प्रत्येक खाजगी वाहने चेक करून त्यामध्ये संशियत आरोपी सापडतात का, याचा तपास करीत होते.

दरम्यान, दिनांक २६ ऑगस्ट सोमवारी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास एक लक्झरी बस चेक करीत असताना त्यामध्ये पोलीस अधिकाऱ्यावर हल्ला करणारे संशयित आरोपी बसल्याचे दिसून आले. त्या वेळी टेंभुर्णी पोलीस ठाणे कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार, पुणे शहर यांची टिम यांनी शिताफीने पकडून ताब्यात घेतले. त्याचे कडे विचारपूस करता त्यांनी त्यांची नावे- १) राहुलसिंग रवींद्र सिंग भोंड (वय २० रा. तुळजाभवानी वसाहत गाडीतळ पुणे), २) निहालसिंग मुन्नुसिंग टाक (वय १९) ३) अमरसिंग जगरसिंग टाक (वय २३ रा. इराणीवस्ती गल्ली नंबर ३ पाटील ईस्टेट शिवाजीनगर पुणे) असे नाव असल्याचे सांगितले. सदर आरोपींबाबत पुणे क्राईम युनिट ५ पुणे यांचेशी चर्चा केली असता यातील ताब्यात घेतलेले आरोपीवर वेगवेगळ्या प्रकारचे एकूण १७३ गुन्हे दाखल असून सदरचे आरोपी हे कोयता गँगमधील असल्याची माहिती समोर आली.

यातील आरोपी हे सतत धारदार कोयते, ब्लेड, पिस्टल, रिव्हालव्हर, कात्री असे हत्यार सोबत बाळगत असून व यापूर्वीही त्यांनी पोलिसांवर दोन वेळा प्राणघातक हल्ला केला होता. अशा घातकी आरोपींना टेंभुर्णी पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांनी पकडून पुणे शहर पोलीस यांचे ताब्यात दिले आहे. रविवारी दुपारी वानवडी पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षकावर हल्ला केल्याची घटना घडल्यानंतर पोलीस आरोपींच्या मागावर होते. त्यांच्या वर वानवडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून पोलिसांनी राज्यभर अलर्ट दिला होता. पोलीसावरच जीवघेणा हल्ला झाल्यामुळे संपूर्ण राज्याची पोलीस यंत्रणा सतर्क झाली होती. पुण्याबाहेर जाणाऱ्या सर्वच मार्गावर पोलिसांची करडी नजर होती. टोल नाक्यावर पुण्याबाहेर जाणारे प्रत्येक वाहन तपासले जात होते. आरोपी सोलापूरच्या दिशेने निघाल्याची खबर पोलिसांना मिळाली होती. सोलापूरचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी तातडीने जिल्ह्यातील पोलीस यंत्रणेला सतर्क केले होते. कसल्याही परिस्थितीत हल्लेखोर आरोपी सुटता कामा नयेत, असा आदेश त्यांनी दिला होता.

# घरफोडी करणाऱ्या आरोपीस पोलिसांनी केली अटक

## भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक करून त्याच्याकडून ७२,००० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त करण्यात भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या पोलिसांना यश आले आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ०३ जुलै रोजी फिर्यादी यांच्या घराचा दरवाजा कुलूप लावून बंद असताना कोणीतरी कपाटातील सोन्याचे नेकलेस, घरातील रोख रक्कम, चांदीचे दागिने चोरी केले होते. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी. एस. पाटील यांनी तपास पथकाचे अधिकारी व पोलीस अंमलदार यांना आदेश दिले. त्यानुसार पोलिसांनी आरोपीचा शोध घेत असताना त्यांना हा गुन्हा यश संतोष कुचेकर (वय १८ वर्षे, रा. खंडाळे चौक, तळजाई वसाहत, पदमावती) याने केला असून तो मूळ गाव बोरी, वालचंदनगर, इंदापूर येथे गेला आहे, अशी खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार तपास पथकाचे



अधिकारी व अंमलदार यांनी बोरी, वालचंदनगर, इंदापूर येथे जाऊन आरोपीचा शोध घेतला आणि त्यास अटक करून त्याच्याकडून ७२,०००/- रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.


सदर कामगिरी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी. एस. पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद झिने यांच्या मार्गदर्शनाखाली तपासपथकाचे अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक समीर कदम, पोलीस उपनिरीक्षक नीलेश मोकाशी, पोलीस अंमलदार मितेश चोरमाले, अवधूत जमदाडे, सागर बोरगे, अभिनय चौधरी, हनमंत मासाळ, शैलेश साठे, नामदेव रेणुसे, चेतन गोरे, महेश बारवकर, निलेश ढमढेरे, मंगेश पवार, नीलेश जमदाडे, सतीश मोरे, नीलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, सचिन सरपाले यांनी केली आहे.

# सोलापूर जिल्ह्यात दारु धंद्याविरुद्ध मोहीम

## 65 गुन्हे दाखल; सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**बार्शी : पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सोलापूरच्या ग्रामीण भागात अवैध धंद्यावर धडक कारवाई सुरू केली आहे. ६५ गुन्हे दाखल करण्यात आले असून, सुमारे सहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**



अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण जिल्ह्याचा पदभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रण आणि अवैध धंद्यांवर लक्षकेंद्रित केले आहे. याचाच एक भाग म्हणून काल दि. २४ ऑगस्ट रोजी सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत जिल्ह्यातील २५ पोलीस ठाण्यांकडून अवैध दारू आणि जुगार यावर केसेस करण्यासाठी पथक नेमण्यात आले होते.

या पथकांनी अवैध दारू विक्री करणाऱ्या ५५ लोकांचा शोध घेऊन ५५ गुन्हे दाखल केले आहेत. त्यामध्ये ३८०० लिटर हातभट्टी दारू तयार करण्यासाठी लागणारे गूळमिश्रित रसायन आणि ५५० लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली आहे. तसेच बेकायदेशीर जुगार खेळणाऱ्या १० लोकांवर केसेस करण्यात आलेल्या असून एकूण ४,०२,५०६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली २ पथकांनी मुळेगाव तांडा, सोलापूर येथील अवैध हातभट्टीवर छापे घालून एकूण १,४१,३००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# गुंतवणुकीच्या आमिषाने 13 लाखांची फसवणूक

## विमानतळ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने लोहगावातील नागरिकाची १३ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २६ ते २८ मी दरम्यान हा प्रकार घडला आहे. अनोळखी तरुणाने फिर्यादीशी मोबाईलवर संपर्क साधून विश्वास संपादन केला. फिर्यादीस




शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडून त्यांचे बँक खाते व यूपीआयडीवस्ती १३,१३,९००/- रु. ट्रान्सफर करण्यास सांगुन कोणताही परतावा न देता आर्थिक फसवणूक केली आहे. हा तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) सर्जेराव कुंभार करीत आहेत.


# गुंतवणुकीच्या आमिषाने 11 लाखांचा गंडा

## कोंढवा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने कोंढवा परिसरातील नागरिकाची ११ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार १२ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान हा प्रकार घडला आहे. अनोळखी तरुणाने फिर्यादीशी मोबाईलवर संपर्क




साधून विश्वास संपादन केला. मोठा नफा मिळेल असे आमिष दाखवले पण कोणताही परतावा न देता ११,४६,३१५/- रुपये किमतीची आर्थिक फसवणूक केली आहे. पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील तपास करीत आहेत.

# पुण्यातील वाहतूक होणार वेगवान, कोंडीही हटणार

## वाहतूक पोलिसांकडून 22 दिवसांत 86 लाख रुपयांची दंडवसुली

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पुणे शहरातील कोंडी कमी करून रस्त्यांची वाहनक्षमता वाढवण्यासाठी व वाहतूक वेगवान करण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्यानुसार, वाहतूक पोलिसांनी दि. ०१ ऑगस्ट ते दि. २२ ऑगस्ट या कालावधीत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांकडून एकूण ८६,८२,५०० रुपये दंड वसूल केला आहे.**



पुणे शहरातील नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका व वाहतूकीचा वेळ कमी करण्यासाठी शहरातील वाहतूक वाहिन्या असलेल्या मुख्य ३२ रस्त्यांवर चौक सुधारणा, पार्किंग मॅनेजमेंट, वाहतूक नियंत्रण साधने, वाहतूक विलगीकरण तंत्र इत्यादींच्या माध्यमातून अभिनव योजना राबविण्यात येत आहे.

वाहतूक शाखा व पुणे महानगरपालिका यांच्या समन्वयातून प्रवास वेळ कमी करणे तसेच पुणे शहरातील रस्त्यांची वहन क्षमता वाढविण्यात येत आहे.पोलीस आयुक्त पुणे शहर व अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे शहरामध्ये रस्त्यांचे त्यांचे उपयोगानुसार वर्गीकरण करून त्यावर काम करणाऱ्या इतर स्थानिक प्राधिकरणांच्या मदतीने विशेष उपाययोजना करण्याचा प्रकल्प दि. १६ ऑगस्टपासून सुरू करण्यात आला आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहतूक नियमन करण्यासाठी तसेच मुख्य रस्त्यांवरील वाहतुकीस अडथळा आणणाऱ्या आस्थापनांवर आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर वाहतूक शाखेकडून विशेष कारवाई करण्यात येत आहे. त्यामध्ये दि. १६ ते दि. २१ या कालावधीत मुख्य ३२ रस्त्यांवर **(१) टेम्पो कारवाई - २४१२, (२) क्रेन कारवाई - ६०७, (३) हॉकर्सवर कारवाई - २५१, (४) आस्थापनांना नोटीस देणे - १५६, (५) आस्थापनेवर भारतीय न्याय संहिता कलम २८५ नुसार गुन्हे दाखल - ०१, (६) रॉंग टर्न - ३१, (७) रॉंग साईड - २९९, (८) लोड/अनलोड वाहने - २, (९) सिग्नल जंपिंग - १०३२, (१०) लेन चेंज अॅट सिग्नल - ३, (११) जड वाहनावरील कारवाई - १२३, (१२) फुटपाथवरील कारवाई - ९२, असे सर्व मिळून एकूण ५००९ कारवाई करण्यात आली आहे.त्याचबरोबर, विशेष मोहिमेदरम्यान दि. ०१ ते दि. २२ या कालावधीत वाहतूक शाखेकडून पुणे शहरामध्ये (१) रॅश ड्रायव्हिंग - ६३६, (२) रॉंग साईड - २३९८, (३) अल्पवयीन चालक - ४, (४) सिग्नल जंपिंग - ३९१९, (५) ट्रिपल सीट - २२१२, (६) मोबाईल वापर - १३१४, (७) फॅन्सी नंबर प्लेट - १३०४, (८) ड्रंक अँड ड्राईव्ह - २०३, (९) लेन कीपिंग सिग्नल - २६, (१०) फुटपाथ - ४६९** अशा एकूण १२,४८५ बेशिस्त व वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

# भवानी पेठेत घरफोडी; दागिन्यांची चोरी

## खडक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : भवानी पेठेतील राहत्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी एका महिलेचे सव्वादोन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत.**



या प्रकरणी खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही चोरीची घटना २४ ऑगस्ट रोजी दुपारी १२ ते ४ या वेळेत घडली आहे. अरिहंत प्लायवुड, लक्ष्मी अपार्टमेंट, पहिला मजला, भवानी पेठ येथील फिर्यादींच्या राहत्या फ्लॅटला कुलूप लावून बंद असताना ही घटना घडली.

अज्ञात व्यक्तीने घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि घरातील २,१७,१२८ रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरी करून नेले आहेत. हा तपास पोलीस अंमलदार हर्षल दुडम करत आहेत.

# आदर्शनगरच्या बंगल्यातून चंदनाचे झाड चोरीस

## मार्केटयार्ड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : मार्केटयार्ड परिसरातील आदर्शनगरच्या बंगल्यातून चंदनाचे झाड चोरीस गेल्याची घटना २३ ऑगस्ट रोजी रात्री घडली आहे. मार्केटयार्ड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सुशीलदत्त बंगला, आदर्श नगर, प्लॉट नं.३० येथे राहणाऱ्या फिर्यादीच्या घराच्या कंपाउन्डमध्ये असलेले १५,००० रुपये किमतीचे जुने चंदनाचे झाड चोरट्यांनी कापून चोरून नेले. गेल्या काही महिन्यात शहरातील बंगल्यांच्या आवारातील जुनी चंदनाची झाडे चोरीस जाण्याच्या घटना वाढीस लागल्या आहेत. जुन्या झाडांना बाजारात मोठी किमत मिळते. त्यामुळे चोरटे रात्री सुनसान जागा हेरून अशी झाडे कापून नेत आहेत. पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी आहे. हा तपास पोलीस उप निरीक्षक राहूल जोग करीत आहेत.

# पुण्यात मध्यवस्तीत जुगार अड्ड्यावर छापा; 10 जणांना अटक

## खडक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : गुरुवार पेठेतील कृष्णा हाइट्स बिल्डिंगच्या टेरेसवरील खोलीत सुरु असलेल्या किशोर सातपुते याच्या जुगार अड्ड्यावर खंडणीविरोधी पथकाने छापा घालून जुगार अड्डा चालवणाऱ्या व तीन पत्ती जुगार खेळणाऱ्या अशा १० जणांना अटक केली आहे.**



शाहरुख अख्तर पठाण (वय ३०, रा. कासेवाडी, भवानी पेठ), ज्ञानेश्वर बालाजी यामजले (वय ३९, रा. संतोषनगर, कात्रज), साहिल इब्राहिम साठी (वय २१, रा. चव्हाणनगर), अरुण गोरखनाथ माने (वय ४५, रा. केशवनगर, धनकवडी), जीवन शिवाजी बडे (वय २६, रा. संभाजीनगर, कात्रज), अनंत सतीश खिंवसरा (वय ४४, रा. मार्केटयार्ड), अतुल रामभाऊ बोडके (वय ३५, रा. पिंपळे गुरव), मंगेश सुरेश परदेशी (वय ३७, रा. धनकवडी), विकी सुभाष बनसोडे (वय ३५, रा. पानमळा वसाहत, सिंहगड रोड), ओमकार जयराम जगताप (वय २६, रा. दांडेकर पुल, दत्तवाडी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत, तसेच किशोर बाळू सातपुते (रा. दांडेकर पूल) या जुगार अड्ड्याच्या मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खंडणीविरोधी पथकाचे पोलीस हवालदार सयाजी चव्हाण यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खंडणीविरोधी पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक अभिजित पाटील, विजयकुमार शिंदे, पोलीस हवालदार सयाजी चव्हाण, नितीन कांबळे, गीतांजली जांभूळकर, राजेंद्र लांडगे, मयूर भोकरे हे पेट्रोलिंग करत असताना हवालदार सयाजी चव्हाण व मयुर भोकरे यांना माहिती मिळाली की, कृष्णा हाइट्सच्या टेरेसवरील खोलीत काही लोक जुगार खेळत आहेत. पोलिसांनी तेथे जाऊन पाहणी केली असता टेरेसवरील खोलीत काही जण तीनपत्ती जुगार खेळत असल्याचे दिसले. पोलिसांनी १० जणांना अटक करून पत्त्यांचा कॅट, रोख रक्कम असा १४ हजार रुपयांचा माल जप्त केला आहे. खडक पोलीस अधिक तपास करत आहेत.

# रिक्षाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

## हडपसर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : दारूच्या नशेत रिक्षा भरधाव चालवून महिलेचा चिरडल्याची घटना घडली आहे. या अपघातात महिलेचा मृत्यू झाला. ही घटना २५ ऑगस्ट रोजी शेवाळवाडी भाजी मार्केटच्या समोर घडली. याप्रकरणी हडपसर पोलिसांनी रिक्षाचालकाला अटक केली आहे.**




सारिका राजेंद्र चव्हाण (वय ३८, रा. लोणी काळभोर) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी अमोल सज्जन कानगुडे (वय ३६, रा. वाडगे वस्ती, लोणी काळभोर) यांनी हडपसर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार आनंद रवींद्र दोडके (वय ४०, रा. हिंगणे मळा, हडपसर) याला अटक करण्यात आली आहे.

अधिक माहितीनुसार, आरोपी रिक्षाचालक आनंद दोडके हा दारूच्या नशेत रिक्षा भरधाव चालवत हडपसर येथून लोणीकडे जात होता. शेवाळवाडी येथे भाजीविक्री करणाऱ्या सारिका चव्हाण यांना जोराची धडक दिली. यात सारिका यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यांचे मेंदूला मार लागला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले, असे फिर्यादीत नमूद केले आहे.

याप्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक गांधले करत आहेत.

# कार चोरणाऱ्या दोघांना अटक

## चतु:श्रृंगी पोलिसांची कारवाई

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पाषाण-सुस रोडवरून चोरीला गेलेली कार शोधण्यात पोलिसांना यश आले आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टाटा टिगोर ही ग्रे रंगाची कार (MH 23 BC 6194) ८ ऑगस्ट रोजी चोरीला गेली होती. प्रशांत बोडरडे (वय ३०, रा. स्नेह श्रध्दा शिक्षक कॉलनी, सुस रोड) यांनी फिर्याद दिली होती. पोलिसांनी तपास करून तांत्रिक विश्लेषणाद्वारे दोघांना अटक केली आहे. महेश शिळीमकर (रा. मांजरी वाडी, कात्रज) आणि गोविंद गौतम (रा. सुतार वाडी, पाषाण) अशी त्यांची नावे आहेत.

त्यांच्याकडून साडेसहा लाख रुपये किमतीची कार ताब्यात घेण्यात आली आहे.ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) युवराज नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक प्रणिल चौगुले, पोलीस हवालदार श्रीकांत वाघवले, पोलीस हवालदार बाबूलाल तांदळे, पोलीस हवालदार सुधाकर माने, पोलीस हवालदार इरफान मोमीन, पोलीस हवालदार बाबासाहेब दांगडे, पोलीस हवालदार विशाल शिर्के, पोलीस हवालदार किशोर दुशिंग, पोलीस हवालदार श्रीधर शिर्के, पोलीस अमलदार प्रदीप खरात, पोलीस अमलदार बाळासाहेब भांगले यांनी केली आहे.

# घरफोडी करणारे तिघे सराईत जेरबंद

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशनची धडक कामगिरी

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : घरफोडी करणाऱ्या तीन सराईत गुन्हेगारांना जेरबंद करण्यात विश्रांतवाडी पोलिसांना यश आले आहे.**



विश्रांतवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत पोलीस उपनिरीक्षक पद्मराज गंपले (रात्रपाळी अधिकारी), तसेच धानोरी मार्शलवरील पोलीस अंमलदार आणि पोलीस शिपाई काची आणि काकडे हे धानोरी हद्दीत पेट्रोलिंग करत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, दोन इसम माधवनगर, आदित्य हॉटेल शेजारी, टपरी फोडून चोरी करत आहेत. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी धानोरी मार्शलवरील अंमलदार आणि रात्र गस्त अधिकारी पोलीस उपनिरीक्षक पदमराज गंपले हे घटनास्थळी गेले.

तिथे तीन संशयित इसम स्कूटीवरून पळून जाताना दिसल्याने त्यांचा पाठलाग करून रोहित रामदास मस्के (वय २४, धंदा खाजगी नोकरी, रा. शरद लॉन्स जवळ, महादेव नगर लेन नं ०२, धानोरी पुणे), मयूरेश सिद्धेश्वर भिसे (वय २१, रा. फाळके चौक, कलवड वस्ती, लोहगाव पुणे ३), तेजस वसंत खरात (वय २२, रा. सर्व नं २४६, पानसरे वस्ती, कलवड, लोहगाव पुणे) या तिघांना ताब्यात घेऊन विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथे आणून विश्वासात घेऊन सविस्तर विचारपूस केली असता, त्यांनी माधवनगर परिसरात घरफोडी केल्याचे कबूल केले. त्यांची अंगझडती केली असता रोख रक्कम व साहित्य असा एकूण ४५,०१७६ रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. त्यामध्ये रोख रक्कम १८२० रुपये व पानटपरीतील साहित्य ८२५६ रुपये, तसेच आरोपींनी गुन्हा करताना वापरलेले दुचाकी वाहन (किंमत- ३५,००० रुपये) असे हस्तगत करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मनोज पाटील (अप्पर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर), हिम्मत जाधव (पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, पुणे शहर), अनुजा देशमाने (सहायक पोलीस आयुक्त, खडकी विभाग, पुणे शहर), कांचन जाधव (विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर), शंकर साळुखे (गुन्हे, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर), पद्मराज गंपले (पोलीस उपनिरीक्षक), पोलीस अंमलदार काची, काकडे, केंद्रे, कलांडीकर, माळी, मोरे (सर्व नेमणुक- विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर) यांनी केली आहे.

# देशी कट्टा बाळगणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगारास केले जेरबंद

## खडक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : देशी बनावटीचा कट्टा व जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या सराईत गुंडास पोलिसांनी कासेवाडी नजीक पकडले. त्याच्याकडून देशी बनावटीचा १ गावठी पिस्तूल व २ जिवंत काडतुसे असा २१,००० रुपये किमतीचे माल जप्त करण्यात आला आहे.**



पुणे शहरामध्ये गेल्या काही दिवसांत गुंडांकडून गोळीबाराच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे अग्निशस्त्रे जवळ बाळगणारे, शस्त्र पुरविणारे गुन्हेगारांवर लक्ष ठेवून कठोर कारवाई करण्याबाबत पोलीस आयुक्तांनी आदेश दिले आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक विजय कुंभार, (खंडणी विरोधी पथक २, गुन्हे शाखा) पुणे शहर यांच्या देखरेखीखाली पथक पिस्तूल बाळगणाऱ्या गुंडांची माहिती काढत होते. पोलीस अंमलदार सुरेंद्र जगदाळे व पवन भोसले यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे अग्निशस्त्र बाळगणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार अझर रमजान सय्यद (वय २३ वर्षे, रा. म्हसोबा मंदिर, भवानी पेठ, १० नंबर कॉलनी, खडक, पुणे) यास मीरा हॉस्पिटल शेजारी रोड, त्रिकोणी गार्डनजवळ आला असल्याची खबर मिळाली.

पोलिसांनी जहागीर व्हिलाच्या समोर, कासेवाडी, पुणे येथे सापळा रचून त्यास पकडले. त्याच्याकडून देशी बनावटीचा ०१ गावठी पिस्तूल व ०२ जिवंत काडतुसे असा २१,००० रुपये किमतीचे माल जप्त करून त्याच्याविरुद्ध खडक पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कामगिरी ही गुन्हे शाखा, पोलीस निरीक्षक विजय कुंभार, सहा. पो. निरी. प्रशांत संदे, पोलीस अंमलदार सुनील पवार, सुरेंद्र जगदाळे, पवन भोसले, संग्राम शिनगारे, सैदोबा भोजराव, दिलीप गोरे, अमोल राऊत, प्रशांत शिंदे, चेतन शिरोळकर, अमोल घावटे, अनिल कुसाळकर, गणेश खरात, किशोर बर्गे, चेतन आपटे, आदिनाथ येडे, आशा कोळेकर यांनी केली.

# गुंतवणुकीच्या आमिषाने 21 लाखांची फसवणूक

## बिबवेवाडी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने बिबवेवाडीतील नागरिकाची २१ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार १ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान हा प्रकार घडला आहे


अनोळखी तरुणाने फिर्यादीशी मोबाईलवर संपर्क साधून विश्वास संपादन केला. फिर्यादीस शेअर मार्केटमध्ये चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले व गुंतवणूक करण्यास भाग पाडून नफा न देता २१,७५,००० रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे. पोलीस उपनिरीक्षक विवेक पिसाळ तपास करीत आहेत.

# जाहिराती दिसू नयेत म्हणून पैसे भरुन फसवणूक

## अलंकार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : जाहिराती दिसू नयेत म्हणून बँकेशी कनेक्टेड फोन पे ची माहिती घेवुन एका वृद्ध महिलेची १७ लाख रुपयांची फसवणूक करण्याचा प्रकार एरंडवणे परिसरात घडला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार एका ७३ वर्षाच्या वृद्ध महिलेने या बाबत तक्रार दाखल केली आहे. २५ मार्च रोजी ही घटना घडली आहे. एका अनोळखी तरुणाने फिर्यादी मोबाईलवर संपर्क साधला.

तेव्हा फिर्यादी यांनी त्याला कार्यक्रम पाहताना जाहिराती दिसत असुन जाहीराती दिसू नयेत म्हणून पैसे दिले असल्याचे व पैसे भरूनही मला जाहिराती का दिसत आहेत असे विचारले. तेव्हा त्यांनी तुम्ही भरलेले ज्यादाचे पैसे परत पाठवित असल्याचे कळवुन व बँकेशी कनेक्टेड फोन पे ची माहिती घेऊन अजून कुठे बँकेत खाती आहेत का याची माहिती घेतली व फिर्यादीच्या बँक खात्यांवरून १७,६४,४४४ रुपये त्याच्या खात्यात ट्रान्सफर केले.

याचा तपास पोलीस निरीक्षक सुनीता रोकडे करीत आहेत.

# इंडस कंपनीचे गोदाम फोडून कॉपर केबलची चोरी

## लोणीकंद पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : इंडस कंपनीचे गोदाम फोडून कॉपर केबलची चोरी करण्याचा प्रकार लोणीकंद परिसरात घडला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही घटना २२ ऑगस्ट रोजी घडली आहे. मध्यरात्री पुणे नगर हायवे रोड वरील लोणीकंद गावचे हद्दीत मोनिका हॉटिलसमोरील इंडियन ऑईल पेट्रोलपंपाचे मागे असलेल्या इंडस कंपनीचे वेअर हाऊस लॉक लावून बंद होते.

त्या वेळी मागील बाजूस असलेली भिंत फोडून चोरट्याने केला. आत प्रवेश करून ५,१७.५८६ रुपये किमतीच्या वेगवेगळ्या कॉपर केबल घेऊन गेला. हा तपास सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र गोडसे करीत आहेत.

# पायी चालणाऱ्या महिलांचे मंगळसूत्र चोरी करणारा जेरबंद

## भारती विद्यापीठ पोलिसांची कामगिरी

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पायी चालणाऱ्या महिलांचे मंगळसूत्र चोरी करणाऱ्यास जेरबंद करण्यात भारती विद्यापीठ पोलिसांना यश आले आहे. तीन गुन्हे उघडकीस आले असून, त्याच्याकडून सव्वादोन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ ऑगस्ट रोजी दुपारी २४ वाजता खेडेकर चाळ, महादेव मंदिरासमोरील लेन, आंबेगाव पठार येथे फिर्यादी पायी चालत असताना पांढऱ्या रंगाच्या ॲक्टिव्हा दुचाकीवर असलेल्या अनोळखी इसमाने फिर्यादी यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने ओढून चोरी केले.

या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे. दाखल गुन्ह्यातील अनोळखी आरोपीचा शोध घेण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी. एस. पाटील यांनी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करून सूचना दिल्या. त्यानुसार पथकाचे अधिकारी व अंमलदार मितेश चोरमाले, अभिनय चौधरी, सागर बोरगे, अवधूत जमदाडे यांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे पांढऱ्या रंगाच्या ॲक्टिव्हा दुचाकीवर एक संशयित इसम दिसून आला. त्या संशयित इसमाचा शोध घेत असताना पोलिसांनी समर्थ राजू कोंथीबिरे (वय २६ वर्षे, रा. निवृत्तीनगर, वडगाव बु., पुणे; मुळ सोलापूर) यास ताब्यात घेतले. गुन्ह्यात वापरलेली दुचाकी गाडीवर लेकटाऊन भागात दिसून आला. त्यास ताब्यात घेऊन त्याचेकडे तपास करून त्याचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास नमुद गुन्ह्यात अटक केली आहे. अटके दरम्यान आरोपीकडे तपास करता त्याने आणखी सोन्याचा लक्ष्मीहार व दुचाकी गाडी चोरी केल्याचे कबूल केले असून त्याचेकडून २,२५,००० रुपयांच्या किमतीचे ३२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र व हार जप्त केले आहेत, तसेच दुचाकी गाडी जप्त करण्यात आली आहे. आरोपीकडून एकूण तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी. एस. पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद झिने, तपास पथकाचे अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर कदम, पोलीस उपनिरीक्षक नीलेश मोकाशी, पोलीस अंमलदार मितेश चोरमाले, अवधूत जमदाडे, सागर बोरगे, अभिनय चौधरी, सचिन सरपाले, शैलेश साठे, नामदेव रेणुसे, महेश बारवकर, चेतन गोरे, नीलेश जमदाडे, हनमंत मासाळ, निलेश ढमढेरे, मंगेश पवार, सतिश मोरे, नीलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, विनोद कांबळे यांच्या पथकाने केली आहे.

# शेअरमधून नफ्याचे आमिष दाखवून 24 लाखांची फसवणूक

## स्वारगेट पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळेल, असे आमिष दाखवून २४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. हा प्रकार मुकुंदनगर परिसरात घडला असून, स्वारगेट पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीला अनोळखी तरुणाने मोबाईलवर संपर्क साधला. त्याने कंपनीच्या ॲपद्वारे चांगला आणि शाश्वत नफा मिळेल असे सांगून, ॲप डाऊनलोड करण्यासाठी लिंक पाठवली. त्यानुसार, फिर्यादीने ॲप डाऊनलोड केले.

सुरुवातीला काही रक्कम त्यांच्या बँक खात्यावर क्रेडिट करून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर, फिर्यादीला २४,२७,१३४/- रुपये त्यांच्या बँक खात्यावर ट्रान्सफर करण्यास सांगितले. पण, ट्रेडिंग आणि आयपीओमध्ये झालेला नफा देण्याचे आश्वासन दिल्यानंतरही तो नफा देण्यात आला नाही, तसेच ट्रान्सफर केलेली रक्कमही परत न देता फिर्यादीची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली.

या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप फुलपगारे करत आहेत.

# भांडण मिटवताना तरुणावर जीवघेणा हल्ला

## सिंहगड रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : भांडण मिटवण्यासाठी आलेल्या तरुणावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना झील कॉलेज परिसरात घडली आहे. या प्रकरणी सिंहगड रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी सुरेश परमेश्वर भिलारे (वय १८ वर्षे, रा. मराठा हॉटेल जवळ, न-हे) यास अटक केली आहे. नऱ्हे येथील स्वाद हॉटेल समोर, झील कॉलेज चौका जवळ, फिर्यादीचा मित्र आदित्य श्रीकृष्ण वाघमारे (वय २३ वर्षे, रा. कारी, ता. धारूर, जि. बीड) याच्या सोबत झालेली किरकोळ भांडण मिटविण्यासाठी फिर्यादी व आदित्य तेथे गेले होते. तेथे झालेल्या वादातून सुरेश याने त्याच्या जवळील चाकूने आदित्य याच्या डाव्या हाताच्या काखेजवळ व समोरून छातीच्या खाली असे जीवे ठार मारण्याच्या हेतूने वार करून त्याचा खून करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच फिर्यादी यास शिवीगाळ करून धमकी दिली आहे.

सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव तपास करीत आहेत.

# भेकराईनगरमध्ये चारचाकी वाहनाची तोडफोड

## हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : जुन्या वादातून घरासमोर लावलेल्या चारचाकी वाहनाची मोडतोड करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न एका टोळक्याने भेकराई नगरमध्ये २४ ऑगस्ट रोजी मध्यरात्री केला.**



फिर्यादी यांचे पार्क केलेल्या चारचाकी गाडीचे नुकसान करून हातातील हत्यारे हवेत फिरवत "आम्ही इथले भाई आहोत, मरायचे असेल तर पुढे या," अशी धमकी देऊन परीसरात दहशत निर्माण केली.

पोलिसांनी अक्षय पोपटराव पाडळे (वय ३० वर्षे, रा. म्हाडा वसाहत, विमाननगर) आणि चंद्रकांत पिंटू काबळे (वय २१ वर्षे, रा. गोसावी वस्ती, वैदवाडी, हडपसर) यांना अटक केली आहे. त्यांचे इतर नऊ साथीदारांचा शोध पोलिस घेत आहेत.

हा तपास पोलिस उपनिरीक्षक बापूसाहेब खंदारे करत आहेत.

# वाहनाच्या धडकेने एक ठार

## लोणी काळभोर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : कदमवाकवस्ती गावाच्या हद्दीत प्राजक्ता हाडके पेट्रोलपंपासमोर, पुणे-सोलापूर रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेने एक जण ठार झाला.**



अपघातात एक अनोळखी इसम (वय अंदाजे ६५ वर्षे) रस्ता ओलांडताना धडक बसल्याने ठार झाला. अपघातानंतर वाहन चालक न थांबता, कोणतीही खबर न देता पळून गेला. हा तपास सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार करीत आहेत.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न

## लोणीकंद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पंधरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर घरात घुसून कपडे फाडत अत्याचार करण्याचा प्रयत्न लोणीकंद येथे झाला.**



या प्रकरणी अशोक कुटे (वय ३०, रा. अहमदनगर) याच्याविरुद्ध लोणीकंद पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पीडित मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी घरी एकटी असताना, आरोपीने घरात येऊन तिचे कपडे फाडत अत्याचाराचा प्रयत्न केला. मुलीने आरडाओरडा करून विरोध केला असता, त्याने "आईला सांगितल्यास तुला जीवे मारीन," अशी धमकी दिली.

या प्रकरणाचा पुढील तपास लोणीकंदचे पोलिस निरीक्षक पंडित रेजितवाड करीत आहेत.

# भाजी खरेदी करताना दागिन्यांची चोरी

## अलंकार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : भाजी खरेदी करत असताना चोरट्यांनी पाळत ठेवून महिलेच्या पर्समधील साडेचार लाखांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी केली आहे.**



या प्रकरणी चतु:श्रृंगी येथील ५५ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. २५ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा ते दोन दरम्यान ही महिला पतीसह दुचाकीवर आली होती. गोवरी आळीत भाजी घेत असताना पर्समध्ये दागिने नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. चोरट्याने ४,५९,०००/- रुपयांच्या किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.


हा तपास पोलीस उपनिरीक्षक जयसिंग दाढे करीत आहेत.

# शेअरमध्ये नफ्याच्या आमिषाने साडेसात लाखांची फसवणूक

## मुंढवा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : शेअर खरेदीत गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल असे आमिष दाखवून घोरपडीतील नागरिकाची साडेसात लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. मुंढवा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अनोळखी तरुणाने फिर्यादीशी मोबाईलवर संवाद साधला. "गोल्ड अँड ऑइल"मध्ये शेअर खरेदीसाठी पैसे गुंतवल्यास अधिक नफा मिळेल असे भासवून फिर्यादी यांना लिंक दिली. त्यात मेल आयडी तसेच प्रोमो कोड भरून फिर्यादी यांना शेअर ट्रेडिंगसाठी एक वेबसाइटवर खाते तयार करून वेगवेगळ्या बँक खात्यावर पैसे भरण्यास प्रवृत्त केले. एकूण ७,३५,००० रुपये घेऊन फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली आहे.

हा तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) बाबासाहेब निकम करीत आहेत.

# नफ्याच्या आमिषाने 36 लाखांची फसवणूक

## चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : शेअर बाजारातून गुंतवणुकीद्वारे मोठा नफा मिळेल असे आमिष दाखवून मॉडेल कॉलनीतील ७० वर्षीय आजोबांची ३६ लाखांची फसवणूक झाली आहे. चतु:शृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ ऑगस्ट रोजी हा प्रकार घडला.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनोळखी तरुणाने फिर्यादीशी मोबाईलवर संपर्क साधला. शेअर्सची माहिती देऊन गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल असे आमिष दाखवून, फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला. वेगवेगळ्या शेअर्समध्ये पैसे गुंतवून फायदा मिळण्याचे आमिष व प्रलोभन दाखवून, परतावा मिळत असल्याचे दाखवत फिर्यादींना अजून पैसे गुंतवण्यासाठी भरीस पाडून, फिर्यादींची एकूण ३६,९०,००० रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे.

हा तपास पोलीस निरीक्षक नांद्रे करीत आहेत.

# शेअरमधून नफ्याचे आमिष दाखवून 24 लाखांची फसवणूक

## हडपसर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : शेअरमध्ये गुंतवणूक करून मोठा नफा मिळेल, असे आमिष दाखवून हडपसर येथील एका व्यक्तीची २४ लाखांची फसवणूक झाली आहे. हडपसर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार ४ जून ते ३ ऑगस्ट दरम्यान घडला.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अनोळखी तरुणाने फिर्यादीशी मोबाईलवर संपर्क साधला. शेअर्सची माहिती देऊन गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवून फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला. बँक खात्यावर २४,२७,१३४ रुपये ट्रान्सफर करण्यास सांगितले.

त्यानंतर ट्रेडिंग व आय. पी. ओ. मधून झालेला प्रॉफिट देण्याचे आश्वासन दिले; परंतु त्यांनी तो दिला नाही. तसेच ट्रान्सफर केलेली रक्कम परत न देता ऑनलाइन फसवणूक केली आहे.

याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप फुलपगारे करीत आहेत.

# चारित्र्याच्या संशयावरून पत्नीला मारहाण

## सहकारनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : चारित्र्याच्या संशयावरून पत्नीला मारहाण केल्याची घटना सहकारनगर भागात घडली असून, पतीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चारित्र्याच्या संशयावरून पत्नीला बेशुद्ध होईपर्यंत बेदम मारहाण करण्यात आली.

याप्रकरणी २४ वर्षीय पत्नीने सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता तळजाई वसाहत, पद्मावती परिसरात घडली. या प्रकारात पत्नी बेशुद्ध पडली हे पाहून, तिला घरात टाकून कडी लावून तो पसार झाला.

हा तपास महिला पोलिस उपनिरीक्षक कल्पना काळे करत आहेत.

# पत्नीवर धारदार शस्त्राने केले वार

## कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : सोबत राहण्यास नकार देणाऱ्या पत्नीवर पतीने धारदार शस्त्राने वार केल्याची घटना २५ ऑगस्ट रोजी इंदिरानगर गल्लीनंबर १ येथे घडली.**



या प्रकरणी कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पतीने पत्नीला सोबत राहण्यास नकार दिल्यामुळे धारदार शस्त्राने वार करून तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केला आहे.

याप्रकरणी ३० वर्षीय पत्नीने कोंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार, राजवली हारुण मुलाणी (रा. शहाजीनगर, बावडा, ता. इंदापूर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी गेल्या एक वर्षापासून पतीपासून वेगळ्या राहत होत्या.

तपास पोलीस उप निरीक्षक रवींद्र गावडे करीत आहेत.

# महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**Maharashtra News Network**

RNI TC No.MAHMAR/2023/88387

From : Office No. 301, Tulsi Apts., Near Mahavir Park, Swami Samarth Nagar, Kakde Wasti, Kondhwa BK., Pune - 411 048.




To,

Book Post

# जय शाह आयसीसीच्या अध्यक्षपदी बिनविरोध

## सर्वात तरुण पदाधिकारी : 1 डिसेंबरपासून सूत्रे स्वीकारणार

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**दुबई : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जयशाह यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली.**



या पदासाठी त्यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता. विशेष म्हणजे जय शाह आयसीसीचे सर्वांत युवा अध्यक्ष ठरणार आहेत. येत्या १ डिसेंबरपासून ते आयसीसीची सूत्रे स्वीकारतील, न्यूझीलंडचे मावळते अध्यक्ष ग्रेग बार्कले आयसीसीची सूत्रे शाह यांच्याकडे सुपूर्द करतील. सलग तिसऱ्यांदा अध्यक्षपद भूषविण्यास बार्कले यांनी नकार दिला होता.

पुढील महिन्याच्या अखेरीस किंवा ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या बीसीसीआयच्या वार्षिक साधारण सभेमध्ये शाह यांना सचिवपदाचा राजीनामा द्यावा लागेल. २०१९ पासून ते या पदावर कार्यरत आहेत. शाह हे आयसीसीच्या अध्यक्षपदी विराजमान होणारे पाचवे भारतीयही ठरणार आहेत. याआधी जगमोहन दालमिया, शरद पवार, एन. श्रीनिवासन आणि शशांक मनोहर यांनी आयसीसी अध्यक्षपद भूषविले होते. पुढील ऑलिम्पिक स्पर्धा २०२८ साली अमेरिकेतील लॉस एंजेलिस शहरात रंगणार आहे. या ऑलिम्पिकमध्ये टी-२० क्रिकेटचा समावेश करण्यात आला असून, हे आव्हान यशस्वीपणे पार पाडण्याचे लक्ष्य आयसीसीचे नवे अध्यक्ष जय शाह यांचे असेल. त्याचप्रमाणे, त्याच्यापुढे पाकिस्तानमध्ये आयोजित चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे आयोजन सुरळीत पार पाहण्याचे आव्हानही आहे.

आयसीसी अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला, तेव्हा शाह यांची निवड जवळपास निश्‍चित झाली होती. दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया या देशांतील एका सदस्याने शाह यांच्या उमेदवारीचा प्रस्ताव ठेवला होता आणि एका सदस्याने पाठिंबा दर्शविला होता. आयसीसी संविधानानुसार अध्यक्षपदासाठी एकूण १७ मते पडतात. शाह यांना २०२५ ते २०२८ पर्यंत अनिवार्य 'कूलिंग ऑफ' नियमानुसार विश्रांती घ्यावी लागणार असल्याने, आयसीसी अध्यक्ष म्हणून त्यांची झालेली निवड अचूक ठरली. बीसीसीआय संविधानानुसार कोणताही पदाधिकारी सलग ६ वर्षेच पदावर राहू शकतो.

यानंतर त्याला तीन वर्षे सक्तीची विश्रांती घ्यावी लागते. जय शाह आता सलग दोन वर्षे आयसीसी अध्यक्षपद सांभाळू शकतात. यानंतर ते २०२८ मध्ये बीसीसीआयचे अध्यक्षही बनू शकतात.

# कोमातून उठून, भाग्यश्री भारताची ध्वजधारक

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : कोमातून वाचली; पण कायमचं अपंगत्व आलं. मात्र, महाराष्ट्राची पॅरा ॲथलिट भाग्यश्री जाधवने हार मानली नाही. समोर येईल तो अडथळा पार करत, आता ती पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारतीय पथकाची ध्वजधारक आहे. हे सारे तिने आपल्या मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर मिळवलं. सध्या तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.**



भाग्यश्री जाधव ही मूळची नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील होनवडज गावची आहे. भाग्यश्रीच्या गावासाठी दुष्काळ पाचवीलाच पुजलेला आहे. त्यात शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या भाग्यश्रीचे वडील गतिमंद होते. त्यांच्या कुटुंबीयांचा भार काका आनंदराव जाधव यांच्यावर पडला. घरची परिस्थिती लक्षात घेऊन, १९व्या वर्षीच भाग्यश्रीचे लग्न लावून देण्यात आले. भाग्यश्रीला तेव्हा कदाचित आपले भाग्य बदलले असेच वाटले होते. मात्र, तिच्यावर विषप्रयोग करण्यात आला, ज्यामुळे ती दोन आठवडे कोमात गेली. त्या वेळी ती वाचली खरी; पण कमरेतील नस दबल्याने तिला कमरेपासून खाली अपंगत्व आले. दोन्ही पायांनी अधू झालेली भाग्यश्री कुटुंबातल्या कोणाच्या तरी आधाराने किंवा कोणाच्या तरी सहाय्याने प्रवास करत न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करीत होती. मात्र, तिच्या सासरच्या लोकांची निर्दोष मुक्तता झाली. आजही पोटगी मिळवण्यासाठी तिचा लढा सुरू आहे. आपले आयुष्य सावरण्यासाठी भाग्यश्रीने अहमदपूरच्या 'डी.एड.' कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. मात्र, काकांचे निधन झाल्याने शिक्षण सोडून द्यावे लागले.

भाग्यश्रीची झुंज देण्याची तयारी कायम होती. दरम्यान, तिच्या नाकपुडीत मोठी गाठ झाल्याचे तिच्या लक्षात आले. पुन्हा शस्त्रक्रियेस सामोरे जावे लागले. अपंगत्वावर मात करण्यासाठी भाग्यश्रीचे प्रयत्न सुरूच होते. फिजिओथेरपिस्टच्या सूचनेनुसार नांदेडच्या होमगार्ड मैदानावर व्यायाम आणि शारीरिक कसरती करू लागली. होमगार्डचे तालुका कमांडंट प्रकाश कांबळे यांची तिला साथ लाभली. त्याच वेळी अपंगांच्या स्पर्धेत खेळण्याचा विचार सुरू झाला. भाग्यश्रीने सर्व विचार करून भालाफेक, गोळाफेक आणि थाळीफेक यांना पसंती दिली. पुणे महापौर स्पर्धेत भाग्यश्रीने गोळाफेक आणि भालाफेकमध्ये सुवर्ण, तर थाळीफेकमध्ये ब्राँझपदक जिंकले. त्यानंतर राष्ट्रीय स्पर्धेतही पदके जिंकली. खेळण्यास सुरुवात केल्यावर तीन वर्षांतच भाग्यश्रीची चीनमधील स्पर्धेसाठी निवड झाली. मात्र, सहभागासाठी पैशांचा प्रश्न होता. आईने मंगळसूत्र आणि दागिने गहाण ठेवून पैसा उभा केला. तिने दोन ब्राँझपदके जिंकली.

# कृष्णन पाठक होणार भारताचा हॉकी संघाचा गोलरक्षक

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**नवी दिल्ली : कृष्णन बहादूर पाठक याची अपेक्षेनुसार भारतीय हॉकी संघाच्या अव्वल गोलरक्षक म्हणून निवड झाली आहे. तो काही वर्षे श्रीजेशचा सहायक गोलरक्षक होता. श्रीजेशच्या निवृत्तीनंतर, आशियाई चॅम्पियन्स करंडक हॉकी स्पर्धेसाठी निवडलेल्या भारतीय संघात मुंबईचा सूरज करकेरा याची दुसरा गोलरक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे.**



आशियाई चॅम्पियन्स स्पर्धा आठ सप्टेंबरपासून चीनमध्ये होणार आहे. या स्पर्धेत गतविजेत्या भारतासह दक्षिण कोरिया, मलेशिया, पाकिस्तान, जपान आणि यजमान चीन हे संघ सहभागी असतील. दरम्यान, या स्पर्धेसाठी उपकर्णधार हार्दिक सिंगसह मनदीप सिंग, ललित उपाध्याय, शमशेर सिंग आणि गुरजंत सिंग यांना विश्रांती देण्यात आली आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ब्राँझ पदक जिंकलेल्या संघातील दहा जणांची फेरनिवड करण्यात आली आहे. 'जागतिक मानांकन सुधारण्यासाठी ही स्पर्धा महत्त्वाची आहे. पॅरिस ऑलिम्पिकमधील ब्राँझ पदकानंतर खेळाडू शिबिरात परतले आहेत. आता नवा टप्पा सुरू होणार आहे,' असे मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन यांनी सांगितले. आशियाई चॅम्पियन्स स्पर्धेत भारताची सलामीची लढत चीनविरुद्ध आठ सप्टेंबरला होईल. त्यानंतरचे सामने जपान (९ सप्टेंबर) आणि मलेशिया (११ सप्टेंबर) यांच्याविरुद्ध होतील. पाकिस्तानविरुद्ध १३ सप्टेंबरला आणि कोरियाविरुद्ध १५ सप्टेंबरला सामना होईल. उपांत्य लढती १६ सप्टेंबरला आणि स्पर्धेची अंतिम लढत १७ सप्टेंबरला होणार आहे.


भारतीय संघ : बहादूर पाठक आणि सूरज करकेरा (गोलरक्षक), रोहिदास, हरमनप्रीत सिंग (कर्णधार), बचावपटू : जर्मनप्रीत सिंग, अमित जुगराज सिंग, संजय, सुमीत. मध्यरक्षक : विवेक सागर प्रसाद (उपकर्णधार), राजकुमार पाल, नीलकांता शर्मा, मनप्रीत सिंग, महंमद राहील मौसीन. आक्रमक : अभिषेक, सुखजित सिंग, अरजित सिंग हुंदाल, उत्तम सिंग, गुरजोत सिंग.

# अमेरिकन ओपनमध्ये विक्रमी सामना

## पाच तास, 30 मिनिटे... रंगली झुंज!

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**न्यूयॉर्क : ब्रिटनचा डॅनिएल इव्हान्स आणि रशियाचा कारेन खाचानोव यांच्यातील अमेरिकन ओपन ग्रँड स्लॅम टेनिस स्पर्धेतील पुरुष एकेरीची सलामीची लढत पाच तास आणि ३५ मिनिटे रंगली. टायब्रेकची सुरुवात झाल्यापासून म्हणजे १९७० नंतरची ही अमेरिकन ओपन स्पर्धेतील सर्वाधिक वेळ चाललेली लढत ठरली.**



या लढतीत लढवय्या इव्हान्सने चिवट खाचानोववर ६-७ (६), ७-६ (२), ७-६ (४), ४-६, ६-४ असा विजय मिळवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. आपली लढत विक्रमी वेळ चालली आहे, याचा अंदाजही सुरुवातीला इव्हान्सला नव्हता. लढत संपल्यानंतर त्याने स्कोअरबोर्डवर एक नजर टाकली. आपण किती वेळ खेळत होतो, हे पाहण्यासाठी त्याने स्कोअरबोर्डकडे पाहिले. दोन्ही खेळाडूंनी तोडीस तोड खेळ केला. प्रत्येक गुणासाठी दोघेही लढत होते. एका सेटमध्ये २२ शॉटची रॅली रंगली. यापूर्वीचा विक्रम १९९२चा होता. त्या वेळी उपांत्य फेरीत स्टेफन एडबर्गने मायकेल चंगवर पाच तास आणि २६ मिनिटांच्या संघर्षानंतर विजय मिळवला होता.